
# ई-अभ्यंग










## ई-अभ्यंग
दिवाळी पाडवा विशेषांक

(मध्यवर्ती कार्यालय)
द्वारा श्री विनय सुधाकर अभ्यंकर,
३, ओम गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
आदर्श निवास केन्द्र, ठाणे (प): ४००६०३

### ⌘ अनुक्रमणिका ⌘

१. संपादकीय ........ ०२
२. कार्यकारी मंडळ ........ ०३
३. तेजोमय दिवाळी ........ ०४
४. चौदा विद्या व चौसष्ट कला ........ ०६
५. अष्टविनायक महिमा ........ ०७
६. तीर्थप्रसादातलं विज्ञान ! ........ १५
७. दैवतांच्या उपासना ........ १५
८. अभिजात संगीतकार : सुधीर फडके ........ १६
९. साईबाबांचे देवस्थान शिर्डी ........ १८
१०. कोणत्या देवाला किती प्रदक्षिणा घालाव्यात ? ........ २२
११. हे आवर्जून करावे ........ २२
११. शेतकऱ्यांचा मित्र पक्षी- कोतवाल ........ २३
१२. पर्यावरण आणि आरोग्य ........ २५
१३. उच्च व निम्न रक्तदाब- काही घरगुती उपचार ........ २७
१४. औषधी रसायनांसाठी उपयुक्त तंत्र ........ २८
१५. गीता रहस्य ........ ३०
१६. आदी कैलास दर्शन-एक रोमांचकारी प्रवास ........ ३१
१७. कुंडलीच्या माध्यमातून विवाह आणि वैवाहिक जीवन ........ ३२
१८. अभ्यंग या पहिल्या गुढीपाडवा ई-विशेषांकाचे उद्‌घाटन. त्या प्रसंगी टिपलेले छायाचित्र. ........ ३४-३५
१९. श्री विजय भास्कर अभ्यंकर व त्यांच्या ट्रेकने आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी टिपलेले विविध मनोहरी छायाचित्र ........ ३९-४४

## ई-अभ्यंग
दिवाळी पाडवा विशेषांक

### संपादक - मंडळ

**डॉ संपदा लिलाधर अभ्यंकर**
प्रमुख संपादक

**श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर**
कार्यकारी संपादक

**श्री शशिकांत दत्तात्रय अभ्यंकर**
सह-संपादक

**श्री निशिकांत शंकर अभ्यंकर**
सह-संपादक

### सल्लागार

श्री चंद्रशेखर गजानन अभ्यंकर, सातारा

श्री सुधीर बी. अभ्यंकर,मुंबई

श्री प्रकाश प्रभाकर अभ्यंकर, नागपूर

सौ. आरती संजय कार्लेकर, सावंतवाडी

श्री सचिन दिनकर अभ्यंकर, पुणे

श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार

श्री संजय प्रभाकर अभ्यंकर, मुंबई

सौ. अरुंधती जयंत नगरकर, ठाणे

अंकात प्रकाशित केलेल्या सर्वच मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय



**आज** दिवाळी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर अभ्यंकर परिवार, मध्यवर्ती कार्यालय ठाणे यांनी तयार केलेला व देश विदेशातील सर्व अभ्यंकर कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणींना ई-अभ्यंग अंक-२ हा दिवाळी पाडवा विशेषांक वेबसाईटवर प्रदर्शित करतांना मला फार आनंद होत आहे.

या दिवाळी पाडवा विशेषांकाबद्दल सांगावयाचे झाले तर मागच्या वेळी आवाहन केल्या प्रमाणे काही चांगले लेख व इतर संकलित माहिती अभ्यंकर परिवाराला ई-मेल द्वारे प्राप्त झाल्याने ती प्रकाशित करतांना अधिक वेळ लागला नाही. त्यामुळे माहिती पाठविणा-या सर्व कुलबंधूंना मनःपूर्वक धन्यवाद.

सन २००४ मध्ये अभ्यंकर परिवाराच्या पाली येथील 'स्नेहबंध' या वृद्धाश्रमात संपन्न झालेल्या वार्षिक स्नेहसंमेलनात सर्वप्रथम मी सहभागी झालो व परिवाराचे कार्य व तेव्हाच्या कार्यकारिणीची आपुलकी व सहकार्याची भावना बघून प्रभावित झाल्याने पुढील प्रत्येक संमेलनात सहभागी व्हावयाचे असे मनाशी ठरविले. नंतर परिवाराचा कुलवृतांत मी विकत घेतला व त्यामधे आपल्या 'सासवने' घराण्याविषयीची माहिती बघून व देशाच्या विविध भागात एवढे अभ्यंकर कुलबंधू/भगिनी आहेत हे वाचून तर मी थक्कच झालो. कारण माझा असा गैरसमज होता की 'अभ्यंकर' या आडनावाची फार-फार तर १००-२०० कुटुंबे असतील.

मी सासवन्याला बरेच वेळा गेलो पण कै. ज. द. अभ्यंकर व परिवाराच्या कुलवृतांत समितीचे इतर कोणी सदस्य कधी माझ्या उपस्थितीत सासवने येथे काकांच्या घरी आले असे मला कधी कळले नाही. तरी सद्धा सासवने घराण्याची येवढी तपशीलवार माहिती संकलित केल्याचे बघितल्यावर मी आश्वर्यचकित झालो. तद्‌नतर परिवाच्या जेष्ठ व श्रेष्ठ व्यक्तिशी संपर्क वाढल्याने अभ्यंकर कुलबंधूसाठी कै. ज. द. अभ्यंकरांनी जास्तीत जास्त अभ्यंकर कुलबंधूशी प्रत्यक्ष संपर्क साधून ती पुस्तक रुपाने छापल्याचे ऐकून तर मी खूपच प्रभावित झालो व त्यामुळे कै. ज.द. अभ्यंकर हे आज माझे 'प्रेरणास्थानच बनले आहेत' असे मी सर्वांना आवर्जुन अभिमानाने सांगतो. कारण मिळालेल्या माहिती प्रमाणे जर कै. ज.द. अभ्यंकर नसते तर कुलवृतांत अपुर्ण अवस्थेतच राहिला असता असे सर्व सांगत असतात. श्री गजानन महाराजांच्या कृपेने माझ्यावर अभ्यंकर परिवार मध्यवर्ती कार्यालयाच्या सचिव पदाची जवाबदारी जानेवरी २००७ मध्ये परिवाराचे कार्याध्यक्ष कै. सुधाकर कृष्णाजी उर्फ बापू अभ्यंकर व संमेलनाध्यक्ष श्री वामनराव अभ्यंकर, ज्ञानप्रबोधिनी पुणे यांच्या उपस्थितीत व आपणा सर्वांच्या अनुमोदनाने माझ्यावर सोपोविण्यात आली व ती मी स्विकारली. मला अभिमान आहे की परिवाराच्या कार्यकारी सदस्यांच्या मदतीने आत्तापर्यन्त पुणे व मालवण येथे परिवाराचे अनुक्रमे १७वे व १८वे वार्षिक स्नेहसम्मेलन यशस्वीपणे आयोजित करुन परिवाराच्या जास्तीत जास्त कुलबंधू/भगिनी/माहेरवाशिणी यांच्याशी प्रत्यक्ष वा पत्राद्वारे तसेच दूरध्वनी द्वारे संपर्क साधण्याचा प्रयत्न करुन परिवाराच्या कार्याबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

मला येथे असे नमूद करतांना फार आनंद होत आहे की विद्यमान कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी स्वतः खूप महेनत घेऊन जास्तीत जास्त आजीव सभासदांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला आहे. यामध्ये विशेष करुन अनुक्रमे मुंबईचे श्री सुधीर बी अभ्यंकर, कल्याणचे श्री मनमोहन अभ्यंकर तसेच मुंबई विलेपार्ले येथील श्री विजय अभ्यंकर यांचा यात मोलाचा वाटा आहे.

अभ्यंकर परिवाराच्या उत्पन्नात जास्तीत जास्त वाढ व्हावी याकरिता विविध उपक्रम राबविण्याचा कार्यकारी मंडळाच्या सदस्यांनी प्रयत्न केला आहे त्यामध्ये वार्षिक स्नेहसंमेलनाच्या वेळी सर्वांना एक डबा देऊन **'एक रुपया दररोज'** ही संकल्पना सांगून वर्षाला जे काही पैसे जमतील ते परिवाराला जमा करावे असे आवाहन वेळो-वेळी सर्वांना करण्यात येते. तसेच परिवाराच्या पुस्तकरुपी कुलवृतांताच्या प्रति संपल्याने ते सीडी मध्ये उपलब्ध करुन देण्यात आले आहे, ज्याची किंमत नाममात्र १०० रुपये आहे. तसेच ज्यांच्या कडे इंटरनेटची सुविधा नाही अशा कुलबधुंना ई-अभ्यंग गुढीपाडवा विशेषांक(अंक-१) व दिवाळी पाडवा विशेषांक(अंक-२) सीडी तसेच पत्रिकेच्या रुपात उपलब्ध करुन देण्याचे ठरविले आहे.

मला पूर्ण विश्वास आहे कि आपल्याला हा दिवाळी पाडवा विशेषांक अवश्य आवडेल व आपण याबद्दलची प्रतिक्रिया आम्हाला जरुर पाठवाल. तसेच जास्तीत जास्त कुलबंधूंनी परिवाराच्या विविध उपक्रमांना व्यक्तिशः व आर्थिक मदत करावी व परिवाराचे कार्य अधिक वृद्धिंगत करण्यास मोलाचा वाटा उचलावा हि विनंती व पुढील ई- गुढीपाडवा विशेषांकासाठी उपयुक्त लेख, कविता व संकलित माहिती पाठवावी, त्याचे स्वगतच होईल.

■■■■■

# अभ्यंकर परिवार

(मध्यवर्ती कार्यालय)
द्वारा श्री विनय सुधाकर अभ्यंकर,
३, ओम गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.
आदर्श निवास केन्द्र, ठाणे (प): ४००६०३

## -: कार्यकारिणी :-

| | | |
|---|---|---|
| **अध्यक्ष** | डॉ. सौ. संपदा लिलाधर अभ्यंकर, ठाणे | (९३२३८७३०७५) |
| **उपाध्यक्ष** | श्री वामन ना. अभ्यंकर, पुणे | (०२०-२७६५७५०८) |
| **सचिव** | श्री विवेक दत्तात्रय अभ्यंकर, नालासोपारा | (९०९६०८१६९३) |
| **खजिनदार** | श्री शशिकांत दत्तात्रय अभ्यंकर, ठाणे | (९८३३२८०३९८) |
| **सह-खजिनदार** | श्री अशोक विद्याधर अभ्यंकर, ठाणे | (९९६७३५८९३५) |

### -: विभाग प्रमुख :-

**मुंबई विभाग**

| | |
|---|---|
| श्री सुधीर बी अभ्यंकर (उपाध्यक्ष) | (९३२४८३७८२७ |
| श्री सुरेश के. अभ्यंकर (सह-सचिव) | (९४२२६६७०२५) |

**पुणे विभाग**

| | |
|---|---|
| श्री अरुण बा. अभ्यंकर (उपाध्यक्ष) | (९४२२३१३५७२) |
| श्री अनिल विष्णू अभ्यंकर (सह-सचिव) | (०२०-२४४७१९३६) |

**नागपूर विभाग**

| | |
|---|---|
| श्री प्रकाश प्रभाकर अभ्यंकर (उपाध्यक्ष) | (९८५०३१७०८९) |
| श्री अनिल विठ्ठल अभ्यंकर (सह-सचिव) | (९९२३०४३३२१) |

**सिंधुदुर्ग विभाग**

| | |
|---|---|
| सौ. आरती संजय कार्लेकर (उपाध्यक्ष) | (९४२२४३४३२८) |

**रत्नागिरी विभाग:**

| | |
|---|---|
| श्री. भास्कर मुकुंद अभ्यंकर (उपाध्यक्ष) | (०२३५५-२६२४५७) |

**सातारा विभाग**

| | |
|---|---|
| श्री चंद्रशेखर गजानन अभ्यंकर(उपाध्यक्ष) | (९९२१४५५१८६) |

### -: कमिटी सदस्य :-

| | | | |
|---|---|---|---|
| श्री निशिकांत शंकर अभ्यंकर | (९३२३७३८६३१) | श्री संजय प्रभाकर अभ्यंकर | (९८६९५३८४३५) |
| श्री मनमोहन प्रभाकर अभ्यंकर | (९८६९१६८२२८) | सौ. अरुंधरी जयंत नगरकर | (९८६९८६९१८५) |
| श्री विजय भास्कर अभ्यंकर | (०२५०-२५२८८७०) | श्री अमित माधव अभ्यंकर | (९८२०२१३३६८) |
| सौ. चित्रा विवेक अभ्यंकर | (९८१९४८७००३) | सौ. संजीवनी सुहास अभ्यंकर | (०२४०-२३६१०९०) |
| श्री सचिन दिनकर अभ्यंकर | (८०८७८७३१५०) | श्री मकरंद श्रीधर अभ्यंकर | (९८२१३०९६३८) |
| श्री विवेक गणेश अभ्यंकर | (९८७०५८१२१७) | श्री तेजस विजय अभ्यंकर | (९८२१९०६०४६) |
| श्री विजय वामन अभ्यंकर | (०२०-२६१८८२२२) | श्री विनय सुधाकर अभ्यंकर | (०२२-२५३२३८५४) |

# तेजोमय दिवाळी

सौ. स्नेहल निशिकांत अभ्यंकर



**तमसो मा ज्योतिर्गमय।**

अंधारातून उजेडाकडे नेणारा प्रकाश आनंद, संमृद्धी व ऐक्य देणारा सण म्हणजे दिवाळी !

अश्विन वद्य द्वादशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया असा सहा दिवस चालणारा हा सण अनादिकालापासून चालत आला आहे. पूर्वी आर्य लोक उत्तर ध्रुवावर राहत असत. उत्तर ध्रुवावर सहा महिन्यांची रात्र व सहा महिन्यांचा दिवस असतो. कार्तिक शुद्ध प्रतिपदेला या परिसरात सूर्याचे पहिले किरण दिसतात. सहा महिन्यांच्या रात्रीनंतर व सूर्यप्रकाशाची प्रतीक्षा केल्यानंतर हे किरण आर्यांना अत्यंत आनंद देत असत म्हणून त्यांनी त्याचे स्वागत दीपोत्सवाने केले. ती परंपरा आजही भारतामध्ये घराघरांत पाळली जाते.



पूर्वीच्या काळी बहुतेक सर्वच घरांपुढे अंगणे होती. त्यामुळे दिवाळीत सायंकाळी दारासमोर गाईच्या शेणाचा सडा टाकला जाई कारण गाईच्या शेणामध्ये ‘फॉरमल्डीहाईड’ हे जंतुनाशक आहे. त्या सड्यामुळे घराचे अंगण निर्जंतूक व स्वच्छ होते. सडा टकलेल्या अंगणात रांगोळी काढली जाते. अखिल मानवजातीला आपल्या अंगावर धारण करणाऱ्या पृथ्वीला नटवण्यासाठी तिच्यापासून निर्माण झालेल्या शिरगोळ्याच्या पिठाने रांगोळी काढली जाते. त्यात अनेक रंग मिसळून किंवा हळद-कुंकू भरुन ती रांगोळी अधिक आकर्षक बनवली जाते. रांगोळ्या काढण्याची पद्धत अनादिकालापासून असून सर्व धर्मांत रांगोळ्या काढल्या जातात. आजकाल घराभोवतीची अंगणे अभावानेच दिसत असली तरी आजही दिवाळीमधे सर्वजण आपले घर व आपल्या सभोवतीच्या परिसर झाडून स्वच्छ करतात व उपलब्ध जागेत रांगोळी सजवतात. मातीच्या पणत्या, आकाशकंदील आणि विजेच्या दिव्याच्या रोषणाईने सर्व परिसर प्रकाशाने उजळून निघतो. लाडू, करंज्या, चकल्या, अनारसे, कडबोळे असे अनेक पदार्थांबरोबर पक्वान्नांचा आस्वाद घेतला जातो. थंडीच्या दिवसात स्निग्ध पदार्थांमुळे प्रकृती पुष्ट होते त्यामुळे दिवाळीत तळीव व तुपट पदार्थांची रेलचेल असते. दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्यासाठी फटाक्यांची आतषबाजी केली जाते.

पुराणांमध्ये दिवाळीशी निगडित अनेक कथा आहेत. त्या प्रत्येक कथेची मांडणी आणि त्यातील व्यक्तीरेखा भिन्न-भिन्न असल्या तरी या सर्व कथांतून वाईटावर चांगल्याचा, असत्यावर सत्याचा आणि अंधारावर प्रकाशाचा विजय हेच सूत्र दिसून येते. दिवाळी हा दिव्यांचा सण असल्याने आपल्या अंतरातील ज्ञानाचा दिवा लावून दिवाळीच्या सहाही दिवसांचे वैशिष्ठ्य जाणून घेऊन त्यातील विचार दैनंदिन जीवनात आचरणात आणणे महत्वाचे आहे. अशा या दिवाळीचा खरा प्रारंभ होतो तो अश्विन वद्य द्वादशीपासून !

दिवाळीचा पहिला दिवस म्हणजे ‘वसुबारस’! श्रद्धा व अंधश्रद्धा यातील अंतर समजावून सांगणारा दिवस. इंद्र पाऊस पाडतो म्हणून इंद्राची पूजा केली पाहिजे अशी गोकुळातील लोकांची अंधश्रद्धा होती. परंतु गोवर्धन पर्वतामुळे पाऊस पडतो, आपण त्याची पूजा केली पाहिजे असे श्रीकृष्णाने लोकांना सांगितले. लोकांनी त्यानुसार गोवर्धनाची पूजा केली. त्यामुळे इंद्र चिडला व त्याने मुसळधार पाऊस पाडला तेव्हा श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत उचलून त्याखाली गोकुळवासियांचे संरक्षण केले तो दिवस म्हणजे वसुबारस ! याच दिवसाला ‘गोवर्धन द्वादशी’ असेही म्हणतात. हा दिवस अश्विन वद्य द्वादशी. या दिवशी सवत्स

धेनूची पूजा केली जाते. ज्यांच्याकडे घरी गुरे वासरे आहेत त्यांच्याकडे या दिवशी पुरणावरणाचा स्वयंपाक करुन गाईची तिच्या वासरासह निरांजन ओवाळून पूजा केली जाते. केळीच्या पानावर पुरणपोळी वगैरे पदार्थ वाढून गाईला खाऊ घालतात. या पद्धतीमागे आपल्या मुलाबाळांना चांगले आरोग्य व सुख लाभावे हीच शुद्ध भावना असते.

**दुसरा दिवस म्हणजेच 'धनत्रयोदशीचा'**

अश्विन वद्य त्रयोदशी लक्ष्मीच्या म्हणजेच धनाच्या श्रीमंती बरोबर आरोग्याची श्रीमंती पण महत्वाची आहे. असा संदेश देणारा दिवस. हा दिवस धनतेरस, धन्वंतरी जयंती, धनपूजन दिवस व यमस्वागतदिन म्हणून ही ओळखला जातो.

समुद्रमंथनातून भगवान धन्वंतरी अंमृतकलश घेऊन अश्विन वद्य त्रयोदशीला प्रकट झाले. त्याची स्मृती म्हणून घनत्रयोदशीचे महत्व आहे. घन्वंतरी हे वैद्य व डॉक्टरांचे आराध्यदेवत असल्याने या क्षेत्रातील लोक हा उत्सव भव्यतेने संपन्न करतात.

या दिवशी सूर्यास्ताला तुळशीजवळ दिवा लावतात व घरात अपमृत्यू होऊं नये म्हणून तो यमराजाला अर्पण करण्याची पद्धत आहे. एका पुराणाकथेप्रमाणे यमाने आपल्या दूतांना वचन दिले की अश्विन वद्य त्रयोदशी ते कार्तिक शुद्ध द्वितीया या काळात ज्यांच्या घरासमोर दीपमाला असतील त्या घरात अपमृत्यू होणार नाही म्हणून त्या दिवसापासून प्रत्येक घरावर, दारात दिवे लावण्याची परंपरा सुरु झाली.

**दिवाळीचा तिसरा दिवस म्हणजे 'नरक चतुर्दशीचा'** !

या दिवशी श्रीकृष्णाने नरकासुराचा वध करुन सर्वांना भयमुक्त केले. विजय मिळवून द्वारकेत आलेल्या श्रीकृष्णाचे स्वागत सर्व द्वारकावासियांनी दीपमाळा लावून केले त्याची स्मृती म्हणून हा दिवस साजरा केला जातो.

**पुढचा दिवस हा 'लक्ष्मीपूजन' ! अश्विन अमावास्या.**

अमावस्येच्या अंधारात संपत्तीच्या ऐश्वर्याची पूजा करण्याचा सल्ला भारतीय संस्कृतीने आम्हाला दिला आहे. लक्ष्मीप्राप्तीने उन्मत्त झाले तर माणसाचा अधःपात होतो तर नम्र झाल्यावर विकास होतो हा व्यावहारिक सिद्धांत लक्ष्मीपूजनात आहे. स्वच्छता करुन आरोग्य देणाऱ्या केरसुणीची पूजा करण्याचा सल्ला आमच्या पूर्वजांनी दिला आहे. या दिवशी संध्याकाळी लक्ष्मीचे पूजन केले जाते. लक्ष्मीपूजन हे स्थिर लग्नावर करतात. त्यामुळे लक्ष्मी स्थिर राहते. अनेक घरात श्रीसूक्ताचेही पठण करतात.

या दिवशी सूर्य दक्षिणायनात असून तुळेत प्रवेशलेला असतों तुळेचे बोधचिन्ह तराजू(BALANCE)आहे. म्हणूनच व्यापारी लोकांचे हिशेबाचे नवीन वर्ष लक्ष्मीपूजनानंतर सुरु होते.

**पुढचा दिवस 'बळीप्रतिपदा'- कार्तिक शुद्ध प्रतिपदा.**

बळीला पाताळात घालून देवांची मुक्तता करणा-या भगवान विष्णूंच्या वामनावतारातील पराक्रमाचा स्मृतीदिन म्हणून या दिवसाला महत्व प्राप्त झाले आहे. या दिवशी उज्जैनीचा राजा विक्रमाने 'विक्रमसंवत्सराचा' प्रारंभ केला. हा साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त आहे. व्यापारी लोकांच्या जमाखर्चाच्या कीर्दखतावणीच्या नवीन वह्या या दिवशी सुरु होतात. पती-पत्नीतील प्रेमाचाही हाच दिवस.

**शेवटचा दिवस 'भाऊबीज'** !

हा दिवस म्हणजे शरद ऋतूतील कार्तिक शुद्ध द्वितीया. द्वितीयेचा चंद्र आकर्षक व वर्धमानता दाखवणारा आहे. तेव्हा बीजेच्या कोरीप्रमाणे बंधुप्रेमाचे वर्धन व्हावे हीच त्यामागची भावना. याच भावनेने बहीण या दिवशी भावाला ओवाळते. आपल्या मनातील द्वेष व असुया नाहीशी करुन सर्वत्र बंधुभावनेची जागरुकता निर्माण करणारा हा सण !

असा हा दिवाळीचा सण म्हणजे दिव्यांचा, प्रकाशाचा, तेजाचा सण ! खर तर हा प्रत्येकाच्या अंतरातील आत्मतेजाचा सण. भारतीय तत्वज्ञानाप्रमाणे आपले शरीर व मन याच्याही पलीकडे शुद्ध आणि अनंत अशा स्वरुपात जे काही आहे ते म्हणजे आपला आत्मा.

ज्याप्रमाणे आपण आपल्या शारीरिक अस्तित्वाचा जन्मदिवस साजरा करतो तसेच दिवाळी हा आपल्या आत्मिक तेजाचा दिवस आहे. ज्याच्या तेजाने, प्रकाशाने आपण आपल्या अवतीभवती असलेल्या संकटे, दुःख, अडथळे आणि निराशारुपी अंधाराचा नाश करु शकतो, ज्यामुळे आपण आंतरिक आनंदाची अनुभूती घेऊ शकतो.

अशा या आपल्याच अंतरात, अगदी आपल्या निकट असलेल्या आत्मिक तेजाची ज्ञानप्रकाशाची जाणीव करुन देणारी दिवाळी तुम्हा सर्वांना सुख, संमृद्धी, समाधान, आनंद यांची भरभराट करणारी जावो ही शुभेच्छा!

शुभ दिपावली !

# चौदा विद्या व चौसष्ठ कला



श्री निशिकांत शंकर अभ्यंकर

१४ विद्या व ६४ कला याबद्दल अनेकांच्या मनात उत्सुकता असते. त्याबद्दल संकलित केलेली माहिती खालिलप्रमाणे देत आहोत :-

## १४ विद्या आहेत

चार वेद + सहा वेदांगे + न्याय, मिमांसा, पुराणे व धर्मशास्त्र = १४

**चार वेद-** १. ऋग्वेद २. यजुर्वेद ३. सामवेद ४. अथर्ववेद

### सहा वेदांगे:

१. व्याकरणात- भाषेतील शब्दांच्या व्यवहाराचे शास्त्र
२. ज्योतिष- ग्रहगती तथा सामुद्रिक जाणण्याची विद्या
३. निरुक्त-वेदांतील कठीण शब्दांचे अर्थ सांगणारे शास्त्र
४ . कल्प-धार्मिक विधि-व्रतांचे वर्णन करणारे शास्त्र
५ . छंद-शब्दांची गानयोग्य रचना व काव्यवृत्ताचे ज्ञान
६ . शिक्षा-शिक्षण, अध्यापन व अध्ययन

आणि न्याय, मिमांसा, पुराणे, धर्मशास्त्र असे मिळून १४ कला आहेत.

**६४ कला खालील प्रमाणे आहेत :**

१. पानक रस तथा रागासव योजना-मदिरा व पेय तयार करणे
२. धातुवद- कच्ची धातू पक्की व मिश्रधातू वेगळी करणे
३. दुर्वाच योग- कठीन शब्दांचा अर्थ लावणे
४. आकार ज्ञान- खाणीं विषयी अंतर्गत सखोल ज्ञान असणे
५. वृक्षायुर्वेद योग- उपवन, कुंज, वाटिका, उद्यान बनविणे
६. पट्टिका वेत्रवाणकल्प- नवार, सुंभ, वेत इत्यादिंची खाट विणणे
७. वैनायिकी विद्याज्ञान-शिष्टाचार व विनय यांचे ज्ञान असणे
८. व्यायामिकी विद्याज्ञान- व्यायामाचे शास्त्रोक्त ज्ञान असणे
९. वैजापिकी विद्याज्ञान- दुस-यावर विजय मिळविणे
१०. शुकसारिका प्रलापन-पक्षांची बोली जाणणे
११. अभिधान कोष छंदोज्ञान- शब्द व छंद यांचे ज्ञान असणे
१२. वास्तुविद्या-महाल, भवन, राजवाडे, सदन बांधणे
१३. बालूडिकर्म- लहान मुलांचे मनोरंजन करणे
१४. चित्रशब्दापूपभक्षविपाक क्रिया- क्रिया, स्वयंपाक करणे
१५. पुस्तकवाचन- काव्यगद्यादी पुस्तके व ग्रंथ वाचणे
१६. आकर्षण क्रिणा- दुसऱ्याला आकर्षित करणे
१७. कौचुमार योग- कुरूप व्यक्तिला लावण्य संपन्न बनविणे
१८. हस्तलाघव-हस्तकौशल्य व हातांनी कलेची कामे करणे
१९. पहेलिका-कोटी, उखाणे वा काव्यातून प्रश्न विचारणे
२०. प्रतिमाला-अंत्याक्षराची योग्यता ठेवणे
२१. काव्यसमस्यापूर्ती- अर्धे काव्य पूर्ण करणे
२२. भाषाज्ञान-देशी-विदेशी बोलिंचे ज्ञान असणे
२३. चित्रयोग- चित्रे काढून रंगविणे
२४. कायाकल्प-वृद्ध व्यक्तिला तरुण करणे
२५. मल्यग्रंथ विकल्प-वस्त्रप्रावरण्यांची योग्य निवड करणे
२६. गंधयुक्ती-सुवासिक गंध वा लेप यांची निर्मिती करणे
२७. यंत्रमातृका-विविध यंत्रांची निर्मिती करणे
२८. अत्तर विकल्प-फुलांपासून अर्क वा अत्तर बनविणे
२९. संपाठ्य-दुसऱ्याचे बोलणे ऐकून जसेच्या तसे म्हणणे
३०. धारण मातृका-स्मरणशक्ती वृद्धिंगत करणे
३१. छलीक योग- चलाकी करुन हातोहात फसविणे
३२. वस्त्रगोपन-फाटकी वस्त्रे शिवणे
३३. मणिभूमिका-भूमीवर मण्यांची रचना करणे
३४. द्यूतक्रिणा-जुगार खेळणे
३५. पुष्पशकटिका निमित ज्ञान-प्राकृतिक लक्षणाद्वारे भविष्य सांगणे
३६. माल्यग्रन्थन-वेण्या, पुष्पमाला, हार, गजरे बनविणे
३७. मणिरागज्ञान- रंगावरुन रत्नांची पारख करणे व ओळखणे
३८. मेषकुक्कुटलावक-युद्धविधी- बोकड कोंबड्यांच्या झुंजी लावणे
३९. विशेषकच्छेद ज्ञान- कपाकावर लावावयाच्या तिलकांचे साचे करणे
४०. क्रिया विकल्प-वस्तुच्या क्रियेचा प्रभाव उलटविणे
४१. मानसी काव्यक्रिया-शीध्र कवित्व करणे
४२. आभूषण भोजन-सोन्या-चांदी वा रत्नामोत्यांनी काया सजवणे
४३. केशशेखर पीड ज्ञान-कुकुट बनविणे व केसात फुले माळणे
४४. नृत्यज्ञान-नाचाविषयीचे शास्त्रोक्त सखोल ज्ञान असणे
४५. गीतज्ञान- गायनाचे शास्त्रीय सखोल ज्ञान असणे
४६. तंडुल कुसुमावली विकार-तांदुळ व फुलांची रांगोळी काढणे
४७. केशमार्जन कौशल्य-मस्तकाला तेलाने मालीश करणे
४८. उत्सादन क्रिया- अंगाला तेलाने मर्दन करणे
४९. कर्णपत्र भंग- पानाफुलांपासुन कर्ण फुले बनविणे
५०. नेपथ्य योग- ऋतुकालानुसार वस्त्रालंकाराची निवड करणे
५१. उदकघात-जलविहार करणे, रंगीत पाण्याच्या पिचकाड़ी करणे
५२. उदकवाद्य-जलतरंग वाजविणे
५३. शयनरचना- पंचक शय्या व मंदिर सजविणे
५४. चित्रकला-नक्षी वेलवुट्टी व चित्रे काढणे
५५. पुष्पास्तरण- फुलांची कलात्मक शैया करणे
५६. नाट्यअख्यायिका दर्शन-नाटकात अभिनय करणे
५७. दशनवसनांगरात-दात, वस्त्रे, काया रंगविणे वा सजविणे
५८. तुर्ककर्म-चरखा व टकळीने सूत काढणे
५९. इंद्रजाल-गारुणविद्या व जादूटोणा यांचे ज्ञान असणे
६०. तक्षण कर्म लाकडावर कोरीव काम करणे
६१. अक्षर मुटिका कथन-करपल्लवीद्वारे संभाषण करणे
६२. सूत्र तथा सूचीकर्म- वस्त्राला रफू करणे
६३. म्लेंछीतकला विकल्प- परकीय भाषा ठाऊक असणे
६४. रत्नरौप्य परीक्षा-अमूल्य धातू व रत्ने यांची परीक्षा करणे

# अष्टविनायकाचा महिमा

सौ. पद्मा प्रशांत वैद्य





**मोरेश्वर - मोरगाव**

मोरगाव, तालुका दौंड, जिल्हा पुणे, हे गणपत्य संप्रदायाचे आद्यपीठ मानले जाते. ह्या पुण्यक्षेत्राबद्दल गणेशपुराणात बरीच महत्वपूर्ण अशी माहिती दिलेली आहे. ह्या क्षेत्राचे प्राचीन नाव, 'भूस्वानंदभुवन'. ह्या गावात मोरांची वस्ती अगदी भरपूर आहे. म्हणूनच ह्या गावाला मोरगाव असे नाव पडले असावे आणि मोर म्हणजे मयूर, म्हणून इथला देव मयुरेश्वर.

गाभाऱ्यातील गणेशाची मूर्ती अत्यंत आकर्षक आहे. मूर्ती बैठी, डाव्या सोंडेची व पूर्वाभिमुख आहे. ह्या मूर्तीला तीन डोळे असून डोळ्यात आणि बेंबीत हिरे चमकत असतात. डोक्यावर नागराजाचा फणा आणि दोन बाजूला सिद्धी-बुद्धीच्या पितळी मूर्ती आहेत. मूर्तीच्यापुढे मूषक व मयूर आहे. मयूरेश्वराची मूळ मूर्ती लहान आकाराची आहे. तिच्यावर शेंदराचे अनेक लेपावर लेप चढवल्याने ती आकाराने मोठी दिसते. केव्हातरी शे-सव्वाशे वर्षांनी हे शेंदराचे कवच निखळून पडते व आतील मूळची रेखीव मूर्ती दिसते. मोरेश्वराचे कवच अशाप्रकारे सन् १७८८ व सन् १८२२ मध्ये पडल्याची माहिती समजते. सभामंडपाचे पूर्वेला आवारामध्ये एक शमीचे आणि एक बिल्वदलाचे झाड आहे. पश्चिम दिशेला कल्पवृक्ष आहे. दर्शनाला आलेले भक्तजन याच वृक्षा खाली बसून अनुष्ठान करीत असतात.

मोरया गोसावी यांनी सुद्धा याच वृक्षाखाली तपश्चर्या केली. तटाच्या आतल्या बाजूला चौकाच्या आठ कोप-यांवर श्रीगणेशाच्या आठ प्रतिमा बसविलेल्या आहेत. असे म्हणतात की ही मूर्ती मूळची नव्हे. खरी मूर्ती रत्नांचा चुरा, लोह आणि माती यांनी बनलेली असून ती दृश्य मूर्तीच्या मागच्या बाजूला ठेवण्यात आलेली आहे.

मूळ मूर्तीची स्थापना स्वत: ब्रम्हदेवानेच केली होती. पुढे पांडव तीर्थयात्रा करीत करीत येथे आले असताना त्यांनी मूळ मूर्तीला कुणाचा धक्का लागू नये म्हणून तिला ताब्यांच्या पत्र्याने बंदिस्त करून ठेवली. आणि हल्लीची मूर्ती नित्यपूजेसाठी स्थापन करण्यात आली.

श्रीमयुरेश्वराची नित्य त्रिकाळ पूजा होते. पहाटे पाच वाजता प्रक्षाळपूजा होते. ही पूजा गुरव पुजारी करतो. नंतर सकाळी सात वाजता व दुपारी बारा वाजता षोडषोपचारे पूजा असते. ह्या पुजा ब्राह्मण पुजारी करतात. या वेळी गणपतीअथर्वशिर्षाची आवर्तने म्हणण्यात येतात. त्रिकाळपूजेत नैवेद्य असतो. पहाटे पाच ते रात्री दहा वाजेपर्यंत मंदिर खुले असते. नंतर शेजारती होऊन मंदिर बंद होते.

मोरया गोसावी यांचा जन्म याच क्षेत्रात झाला. एक दिवस, ब्रम्हकमंडलू-तीर्थात स्नान करीत असताना त्यांना गणेशाची मूर्ती सापडली. ह्या क्षेत्रामध्येच त्यांनी उग्र तपश्चर्या केली आणि सिद्धी प्राप्त करून घेतली. श्रीगणेशाच्या आज्ञेवरूनच आपल्याला कुंडात सापडलेली मूर्ती चिंचवड येथे नेली आणि तेथे त्या मूर्तीची स्थापना केली आणि चिंचवडला येऊन राहिले होते. तरीसुद्धा प्रत्येक शुद्ध चतुर्थीला ते मोरगांवची वारी करायला कधीही चुकत नसत. शेवटी पवनाकाठी त्यांनी जिवंत समाधी घेतली. ह्या मोरेश्वराविषयी, पुराणात काही माहिती दिलेली आहे.

कोणे एकेकाळी चक्रपाणी नावाचा एक राजा मिथिल देशात भंडकी नगरीत होऊन गेला. त्याला सिंधू नावाचा पुत्र झाला. त्या सिंधुने उग्र तपश्चर्या केली आणि सूर्यनारायणाकडून अमरपदाची प्राप्ती करून घेतली. त्यामुळे तो उन्मत्त झाला. आणि त्याने सर्व देवांना जिंकले आणि त्यांचा छळ आरंभला. सर्व देव एकत्र झाले आणि श्री विष्णूला शरण गेले. श्री विष्णूने त्या सिंधूशी युद्ध सुरू केले. परंतु त्या युद्धात विष्णूचा पराभव झाला. आणि त्यामुळे देवांचा छळ तसाच चालू राहिला. सर्व देव आता श्री गजाननाला शरण गेले. श्री गजाननाची त्यांनी प्रार्थना केली. श्री गजाननाने पार्वतीच्या पोटी अवतार घेतला. आणि मोरावर बसून त्याने सिंधूशी युद्ध केले. युद्धात सिंधूचा वध केला. तेव्हापासून मोरगावच्या गजाननाचे नाव मयुरेश्वर अथवा मोरेश्वर असे पडले.

## सिद्धिविनायक - सिद्धटेक

भीमा नदीच्या तीरावर वसलेले सिद्धटेक हे शहरीकरणाचा स्पर्श न झालेले एक लहानसे खेडेगांव आहे. तेथे जाण्यासाठी पक्का रस्ता नाही. जवळपास कुठे रेल्वेमार्गही नाही.

श्री सिद्धिविनायकाचे मंदिर टेकडीवर उत्तराभिमुख असे आहे. वेशीपासून मंदिरापर्यंत सरदार हरिपंत फडके यांनी बांधलेला फरशीचा मार्ग आहे. मंदिरातील गाभारा पंधरा फूट लांबीचा आणि दहा फूट रूंदीचा असा आहे. देवाचे मखर पितळेचे असून दोन्ही बाजूला जय विजय यांच्या दोन मोठ्या मूर्ती उभ्या आहेत. मधला गाभारा इंदूरच्या अहिल्याबाई होळकर



यांनी बांधलेला आहे.

सिंहासन पाषाणाचे आहे. गाभाऱ्यातच देवाचे शेजघर आहे. बाहेरच्या बाजूला खुला सभामंडप आहे. पुढच्या बाजूला महाद्वार आणि त्यावर नगारखाना आहे. सकाळ, दुपार येथे चौघडा वाजत असतो. पेशवाईतले सरसेनापती हरिपंत फडके यांच्या स्मरणार्थ हा चौघडा वाजतो. त्यासाठी दरवर्षी सहाशे रूपयांचे वेतन कर्जतच्या ट्रेझरीतून दिले जाते. मंदिराच्या डाव्या बाजूला भीमा नदी ही दक्षिणेला वाहत असते. भीमानदीवर हरिपंत फडके यांनी घाट बांधला आहे. आणि तेथेच त्यांची समाधी आहे.

श्री सिद्धिविनायकाची तीन फूट उंचीची मूर्ती ही स्वयंभू आहे. रूंदी अडीच फूट आहे. मूर्तीचे तोंड उत्तर दिशेला आहे. मूर्तीची सोंड ही उजव्या बाजूला वळलेली आहे. मांडी घातलेली आहे आणि मांडीवर ऋद्धिसिद्धि ह्या दोघी बसलेल्या आहेत. येथे देवाला प्रदक्षिणा घालण्याची पद्धत बरीच रूढ आहे.

मंदिराच्या पश्चिम बाजूला श्रीशिवाई देवीचे आणि महादेवाचे देऊळ आहे. त्याच बाजूला श्री. काकासाहेब गाडगीळ यांनी आपल्या मातोश्रीच्या स्मरणार्थ एक धर्मशाळा बांधलेली आहे.

फार प्राचीन काळी एकदा ब्रह्मदेवच्या मनात सृष्टीरचना करण्याचा विचार झाला. या साठी त्याने गणेश एकाक्षर मंत्राचा जप केला. ब्रह्मदेवाच्या उग्र तपश्चर्येने गणेश प्रसन्न झाला व तुझ्या सर्व मनोकामना पूर्ण होतील असा ब्रह्मदेवाला वर दिला. त्यानंतर ब्रह्मदेवाने सृष्टी निर्माण केली. काही काळ गेल्यावर निद्रिस्त असलेल्या विष्णूच्या कानातून दोन राक्षस निर्माण झाले. ते मधू आणि कैटभ या नावाने त्रिभूवनात प्रसिद्ध झाले. महाभयंकर असे हे दोन राक्षस ब्रह्मदेवाला त्रास देऊ लागले. त्याच्या त्रासाने सर्व पृथ्वी भयभीत झाली.

विष्णू जागा होई पर्यन्त त्या दैत्यांनी त्रैलोक्यामध्ये मोठा अनर्थ मांडला. श्री विष्णू सर्व आयुधे घेऊन तयार झाले. या दोन दैत्यांनी विष्णूस बाहुयुद्धाचे आव्हान केले. विष्णूने त्यांचे आव्हान स्वीकारले आणि आपल्या चार बाहुंनी दैत्यांशी युद्ध करण्यास आरंभ केला. पांच हजार वर्षे त्यांचे युद्ध चालले होते. पण विष्णूच्या हातून त्यांचा पराभव झाला नाही. पुढे कैलास पर्वतावर जाऊन विष्णूने प्रथम शंकरास भक्तीयुक्त नमस्कार केला व नंतर वीणेवर मंजुळ व सशास्त्र गायन केले. त्या गायनाने शंकर प्रसन्न झाले व त्यास वर मागण्यास सांगितले. त्यावेळी विष्णूने मधुकैटभाचा सर्व वृतांत सांगितला व वधाचा उपाय विचारला. तेव्हा शंकर म्हणाले तू युद्धास आरंभ करण्यापूर्वी श्री गणेशाचे पूजन केले नाहीस म्हणून तुला जय प्राप्ती झाली नाही. आता तू गणेशाच्या षडाक्षर मंत्राचा जप कर व युद्धास जा. दोन दैत्यांशी युद्ध करताना तुला विजय प्राप्त होईल असा आशिर्वाद त्याला दिला. श्री विष्णूकडून त्या दैत्यांचा नि:पात झाला. इथेच श्रीविष्णूला सिद्धी प्राप्त झाली. म्हणूनच ह्या स्थळाला सिद्धक्षेत्र अथवा सिद्धटेक हे नाव मिळाले. टेकडीवर देवालय उभारण्यात आले आणि तेथे गंडकी शिळेची श्रीविनायकाची मूर्ती स्थापन करण्यात आली.

भीमानदीच्या काठी, महर्षी व्यासांनी मोठा यज्ञ केला होता. ते स्थान येथून जवळच आहे. नदीचे पात्र उन्हाळ्यात कोरडे पडते त्यावेळी त्या यज्ञातील भस्म अजूनही दृष्टीस पडते. भाद्रपद शुद्ध प्रतिपदा व माघ शुद्ध प्रतिपदा ते पंचमी

असे दोन मोठे उत्सव येथे होतात. त्यावेळी महापूजा नैवेद्य होऊन तीन दिवस, तीन रात्री आठ वाजता पालखी निघते. रात्री दहा ते १२ पर्यंत धुपारती, पदे शेजारती होते. पहाटे पाच वाजता पुन्हा मिरवणूक काढतात. भाद्रपदापेक्षा येथे माघ महिन्यात मोठी यात्रा असते.

## बल्लारेश्वर -पाली

श्रीबल्लाळेश्वराचे देऊळ फारच मनोहर आहे. त्याचे तोंड पूर्व दिशेला आहे. त्यामुळे सर्वोदय होताच सूर्याची कोवळी सोनेरी किरणे बरोबर देवाच्या मूर्तीवर पडतात. त्यावेळी तिथले वातावरण अगदी पवित्र आणि प्रसन्न असे वाटते. मंदिराचे बांधकाम चिरेबंदी आहे. शिशाचा रस ओतून भिंती मजबूत करण्यात आल्या आहेत. त्यामुळे मंदिराचे बांधकाम एखाद्या



भुईकोट किल्ल्याप्रमाणेच झालेले आहे.

मंदिराचा मुख्य गाभारा पंधरा फूट उंच आहे. तो उंदीर गणपतीकडे पहाणारा आहे. मंदिराबाहेरचा सभामंडप चाळीस फूट लांबीचा आणि वीस फूट रूंदीचा आहे. मुख्य गाभा-यामध्ये नक्षीकाम केलेले मखर आहे. मंदिराच्या समोरच्या बाजूला दोन तलाव आहेत. त्यावर घाट बांधलेले आहेत. तलाव सदोदित पाण्याने भरलेले असतात. परंतु तलावातले पाणी मात्र स्वच्छ नाही आणि पिण्याजोगे नाही. बाहेरच्या कमानीत एक मोठी थोरली घंटा आहे. ती पाहिल्यावर नाशिकच्या नारोशंकरी घंटेची आठवण होते. ही घंटा चिमाजी अप्पा पेशवे यानी वसईचा किल्ला जिंकला त्यावेळी जी लुटालुट झाली, त्यात मिळाली आणि ती मग पेशव्यांनी ह्या देवस्थानाला अर्पण केली असे म्हणतात.

मोरोबा दादा फडणीस यांचे वडील बाबुराव फडणीस यांनी हे देवालय बांधले आणि त्यासाठी नेमणूक करून दिली. त्याचवेळी त्यांनी धर्मशाळा आणि मठही बांधला.

जागृत देवस्थान म्हणून ह्या देवस्थानाची फार ख्याती आहे. जुन्या काळी ह्या देवाला नवसाचे आततायी प्रकार केले जात असे म्हणतात. त्या प्रकारापैकी आपली जीभ कापून देवाला अर्पण करण्याचा एक प्रकार होता. अशी एक घटना १७४४/४५ साली घडल्याची नोंद इतिहासात सापडते.

१७५३/५४ साली खुद्द पेशव्यांनी श्री बल्लाळेश्वरावर अभिषेक केला व अनुष्ठान करविले. ह्याबाबत ऐतिहासिक पेशवे दप्तरात एक नोंद आढळून येते.

गाभा-यात श्री बल्लाळ विनायकाची मूर्ती आहे. तिची उंची तीन फुट आहे. कपाळाचा भाग खोलगट तर बाकीचा चेहरा स्पष्ट असा आहे. सोंड डावीकडे वळलेली आहे. बेंबीमध्ये आणि डोळ्यांमध्ये देदिप्यमान हिरे बसविलेले आहेत. देवाची मूर्ती दगडी सिंहासनावर विराजमान झालेली आहे. सिंहासन मूर्तीच्या सभोवती दडविलेले आहे. मूर्तीच्या बेंबीपासूनचा भाग सिंहसनाच्यावर दिसून येतो. देवाच्या जवळ रिद्धिसिद्धि उभ्या आहेत.

कृतयुगात पल्लीर गावच्या म्हणजे पाली गावात कल्याणशेट नावाचा एक व्यापारी रहात असे. त्याच्या पत्नीचे नाव इंदुमती. पोटी मूलबाळ नसल्यामुळे इंदुमतीने श्रीगणपतीची उपासना सुरू केली. काहीकाळाने, तिला दिवस गेले आणि तिला मुलगा झाला.


त्या मुलाचे नाव तिने 'बल्लाळ' ठेवले. बल्लाळ लहानाचा मोठा होऊ लागला. परंतु त्याला श्रीगणपतीच्या चिंतनावाचून दुसरे काहीच सूचत नसे. रात्रंदिवस तो आपल्या देवतेचे चिंतन करी. त्याच्या संगतीत राहिलेली गावातली मुलेही श्रीगणपतीची उपासना करू लागली. ती मुलेसुद्धा सदोदित गणपतीचे चिंतन करीत राहिली. मग काय? बल्लळाची संगत धरल्यामुळे गावातील मुले बिघडून गेली अशी ओरड सुरू झाली. त्या मुलांच्या पालकांनी बल्लाळच्या पित्याजवळ आपली तक्रार निवेदन केली. कल्याणशेटने आपल्या मुलाला रागवले. त्याने बल्लाळच्या पुढ्यातली मूर्ती उधळून टाकली आणि त्याला भरपूर मार दिला. "तू असा वेडेपण करू नकोस आणि गावातल्या मुलांना बिघडवू नकोस" असाही त्याला दम दिला.

बेदम मार खाल्ल्यामुळे, बल्लाळ बेशुद्ध झाला. श्रीगणपती हे त्याचे दैवत. त्याच्या दैवताला दया आली. दैवत प्रसन्न झाले आणि त्याला अभय दिले.बल्लाळला पावलेला हा गणपती म्हणून बल्लाळेश्वर.

ह्याच देवळाच्या मागच्या बाजूला दुसरे एक देऊळ आहे. ते श्रीधुंडीविनायकाचे देऊळ म्हणून प्रख्यात आहे. श्री धुंडीविनायकाची मूर्ती स्वयंभू आहे. पूर्वी बाळबल्लाळ हा रानात, एका गणपतीच्या मूर्तीच्या भजनपूजनात मग्न असताना त्याचे वडील कल्याणशेट तेथे आले. आणि त्यांनी त्याच्या पुढ्यातली मूर्ती उधळून लावली. जी मूर्ती उधळून लावली तीच ही मूर्ती होय. श्रीधुंडीविनायकाची कथा ही अशी आहे. दर्शन आणि पूजाअर्चा करताना, प्रथम ह्या श्रीधुंडीविनायकाला अग्रमान दिला जातो. आणि नंतर श्रीबल्लाळेश्वराचे दर्शन वगैरे, अशी प्रथा आहे.

पालीचा बल्लाळेश्वर । शमीतळीशिवकुमार ।।
अज्ञभक्ताना कैवार । तोच येईल सर्वदा ।।

**वरदविनायक - महाड**



ह्या देवस्थानाविषयी कथा

प्राचीन काळी विदर्भामध्ये कौंडिण्य नावाचे एक शहर होते. तेथे भीम नावाचा एक पराक्रमी आणि दानशूर असा राजा राज्य करीत होता. राजा असला तरी तो सुखी नव्हता कारण संततीचे सुख त्याला लाभले नव्हते. त्यामुळे आपल्या गादीला वारस नसणार आणि आपला वंशविस्तार होणार नाही याची त्याला चिंता लागून राहिली होती.

एके दिवशी त्याच विचारामुळे त्याचे डोके भणाणून गेले आणि राज्यकारभार आपल्या प्रधानावर सोपवून तो आपल्या राणीसह अरण्यात निघून गेला. अरण्यात गेल्यावर एकदा त्याची आणि विश्वमित्र ऋषींची गाठभेट झाली. आणि त्यांनी राजाला राज्य सोडून देण्या बाबतचे कारण विचारले. तेव्हा राजाने आपणास पुत्रसौख्य नसल्यामुळे आपण हा अरण्यावास पत्करला असे सांगितले. विश्वमित्रांनी राजाला एकाक्षर मंत्राचा जप करण्याचा उपदेश केला.

राजा अरण्यातून माघारी फिरला. राजधानीत परत आल्यावर त्याने दक्षाने बांधलेल्या मंदिरात एकाक्षरी मंत्राचा जप करायला सुरवात केली. उग्र तपश्चर्येमुळे सारे विश्व त्याराजाला श्रीगणेशमय दिसू लागले. श्रीगणेश प्रसन्न झाले, राजाने पुत्रप्राप्तीचा वर मागितला. श्री गणेशानी 'तथास्तु' म्हटले.

यथाकाल राजाला पुत्रप्राप्ती झाली. त्याचे नाव रूक्मानंद ठेवण्यात आले. तो तेजपुंज होता आणि त्याची कांती सोन्यासारखी होती. राजकुमाराला योग्य असे सर्व प्रकारचे शिक्षण दिले. आणि भीमाने आपला राज्यकारभार त्याच्यावर सोपवून त्याला एकाक्षरी मंत्राचा जप करण्याचा उपदेश केला.

राजकुमार रूक्मांगद एकदा शिकारीच्या निमित्ताने अरण्यात गेला. आपल्या नेमबाजीने त्याने ब-याच जनावरांची शिकार केली. जनावरांचा पाठलाग करीत राहिल्यामुळे तो बराचसा थकला. त्याला विश्रांतीची जरूरी होती. म्हणूनच विश्रांतीसाठी जवळच असलेल्या एका ऋषिंच्या आश्रमात तो गेला. मुनी स्नानाला जाण्याच्या गडबडीत होते. त्यांना रूक्मांगदने नमस्कार केला. त्याला आश्रमात बसावयास सांगून ऋषी आपल्या स्नानाला निघून गेले. मुनींची पत्नी मुकुंदा ही अतिशय रूपवती अशी होती. तिचे रूपसौंदर्य अनुपम होते. रूक्मांगदला दमल्यामुळे फार तहान लागली होती. त्याचा घसा कोरडा पडला होता. मुंकुदाजवळ त्याने पाणी मागितले. याचकाला तिने पाणी दिले. परंतु ती रूक्मानंदवर मोहित झाली.

तिला काही सुचेनासे झाले आणि रूक्मांगदला बोलण्यात गुंतवून, तिने आपली वासना तृप्त करण्याची त्याला विनंती केली. परंतु रूक्मांगद तसे दुराचरण करायला तयार झाला नाही. त्याने तिला साफ साफ नकार दिला. तो वश झाला नाही म्हणून ती बरीच कामविव्हल झाली आणि तिने रूक्मांगदला शाप दिला की, 'तुला कुष्ठ रोग होईल'.

रूक्मांगद त्या आश्रमातून बाहेर पडताच, त्याच्या सोन्यासारख्या अंगावर कुष्ठ रोगाचे पांढरे पट्टे दिसू लागले. त्याला फार दु:ख झाले, लोकांना आपण आपले तोंड तरी कसे दाखवावे. याची त्याला लाज वाटू लागली. तो आपल्या

राजधानीकडे गेलाच नाही. अरण्यातील एका वटवृक्षाखाली आसनस्थ होऊन तो एकाक्षरी मंत्राचा जप करू लागला. त्या निराश बनलेल्या राजकुमारापुढे नारदमुनी प्रगट झाले. आणि त्याला म्हणाले, "कदंब नगरामध्ये गणपतीचे एक देवालय आहे. चिंतामणी ह्या नावाने तो देव आणि कंदबतीर्थ ह्या नावाने ते तीर्थ प्रसिद्ध आहे. देवालयासमोर एक सरोवर आहे. तेथे जाऊन त्या सरोवरात जर का तू स्नान केलेस तर तुझा कुष्ठ रोग साफ बरा होईल. तेव्हा ताबडतोब तेथे जा आणि त्या सरोवरात स्नान करा."

रूक्मागंदने उपदेश प्रमाण मानला आणि कुष्ठरोगापासून तो मुक्त झाला.

इकडे कामविव्हल झालेली मुकुंदा जवळच एका शिळेवर लवंडली. आणि रूक्मागंदाचे ध्यान करू लागली. ती बेसावध बसली होती. तिचे पती वाचक्नवि मुनी आश्रमात नव्हते. देवांचा राजा इंद्र यांच्या ध्यानात ही गोष्ट आली. त्याने रूक्मागदाचे रूप घेतले आणि मुकुंदाची कामेच्छा पूर्ण केली. ती गरोदर राहिली. आणि त्या संबंधापासून तिला पुत्र झाला. त्याचे नाव गृत्समद.

ऋग्वेदातील मंत्रदृष्टा असा मुनी तो हाच गृत्समद. अनीति मार्गातून त्याचा जन्म झाला म्हणून याज्ञिक मंडळी नेहमीच त्याचा धिक्कार करीत राहिली. त्याच्या जन्माची ती अजब कहाणी आत्रेय मुनींना अंर्तज्ञानाने अगदी संपूर्ण माहीत झाली होती. वारंवार, गृत्समदाच्या वाट्याला अवमान- अपमान येत राहिले. जेव्हा तेव्हा त्याची अवहेलना होऊ लागली. अशाच एका प्रसंगी, तो रागाने अगदी लालबुंद झाला. संतापाने पाय आपटीत तो आपल्या मातेकडे गेला आणि त्याने आपला पिता कोण म्हणून विचारले. ती म्हणाली- "रूक्मागंद", आपल्या आईचा त्याला अतिशय राग आला आणि त्याने तिला शाप दिला.

"तू अमाप फळे येणारी कंटकी होशील, पण तुझ्या फळांना एकही प्राणी कधी तोंड लावणार नाही." त्याची आई मुकुंदा ही सुद्धा चिडली आणि तिने त्याला शाप दिला - "तुझ्या पोटी एक राक्षस जन्म घेईन आणि तिन्ही लोकांना तो त्रस्त करील." इतक्यात आकाशवाणी झाली - "गृत्समद हा इंद्राचा पुत्र आहे." मुकुंदा बोरीचे झाड झाली. गृत्समद घोर तपश्चर्या करण्यासाठी महडच्या अरण्यात आला.

"गणनां त्वां गणपती" ह्या मंत्राचा त्याने जप केला. श्री गजानन त्याच्यावर प्रसन्न झाले आणि तो मंत्रदृष्टा बनला. महडच्या श्रीवरदविनायकाची मूर्ती, त्या गृत्समदाने स्थापन केली. आणि त्यानेच हे देवालय बांधले अशी समजूत आहे. देवालय पूर्वाभिमूख आहे. लांबून ते एखाद्या कौलेरू घराप्रमाणे दिसते. परंतु आत शिरल्यावर आपल्याला कळून येते की ते कोरलेल्या दगडाचे आहे. कोरीव काम मोठे प्रेक्षणीय आहे. मूर्तीसंबंधी दुसरी एक समजूत अशी आहे की, १६९० साली ही मूर्ती एका गणेशभक्ताला तीथल्या तळ्यात सापडली. त्या भक्ताने मूर्तीची स्थापना एका अखंड दगडाच्या कोनाड्यात केली. हल्लीचे देवालय हे १७२५ साली बांधण्यात आले. १८९२ सालापासून ह्या देवालयातील नंदादीप अखंडपणे तेवत आहे. मूर्ती सिहांसनावर विराजमान झालेली आहे. सिंहासनाभोवती दगडी महिरप आहे. दोनहत्ती आणि मध्य देवी आहे. सिंहासनाहून मूर्ती वेगळी आहे. मूर्ती पाषाणाची असून डाव्या सोंडेंची आहे. मंदिराच्या घुमटाला सोनेरी रंगाचा कळस आहे. देवाच्या गाभा-यापुढे आठ फुटाचा चौरस सभामंडप आहे. बाहेरचा सभामंडप चाळीस फूट लांब आणि चाळीस फूट रूंद असा ऐसपैस आहे. चौफेर गॅलरीवजा माडीही आहे.

देवस्थानाच्या खर्चासाठी नगदी इनाम आहे. १६९० साली शाहू महाराजांनी पहिली सनद दिली. १७३० साली दुसरी सनद देण्यात आली. आणि तिसरी सनद ब्रिटिश अमदानीत देण्यात आली ती १८९४ साली.

महडगावी वरदमूर्ती । करी कामनांची पूर्ति ।।
गृत्समदे केली कीर्ती । गणनांत्वा गणपतीम् ।।

## चिंतामणी - थेऊर

मोटार-थांब्यापासून अवघ्या एका फर्लांगावरच श्रीचिंतामणीचे देवालय आहे. देवालयाचे महाद्वार उत्तराभिमुख आहे. चिंचवडचे मोरया गोसावी यांचे वंशज श्री चिंतामणि देव यांनीच हे देवालय बांधले. त्यानंतर साधारण शंभर एक वर्षांनी, श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनी सभामंडप बांधला आणि ह्या देवालयाचा विस्तार केला. नंतर पेशव्यांचे सेनापती हरिपंत फडके आणखी इतर भक्तमंडळीनी मिळून ह्या देवालयात काही फेरफार करून त्यांची भव्यता आणि शोभा अधिक वाढविली.

देवालयाच्या आवाराबाहेर जवळच पेशवांच्या वाडा होता. परंतु तो वाडा आता तेथे उभा नाही. मुख्य दिंडीदरवाजाचे काही अवशेष मात्र अजूनही शिल्लक आहेत. वाड्यांचे आवार बरेच भव्य दिसते. तेथील भव्य अवशेषांवरून त्या वाड्याच्या पूर्वीच्या भव्यतेची कल्पना येते. ह्या वाड्यापासून थेट नदीपर्यंतची फसरबंदी वाट पेशव्यांनी बांधून काढली होती. ही फसरबंदी वाट मात्र अजूनही सुस्थितीत राहिलेली आहे.

थेऊर गावाच्या तिन्ही बाजूला मुळामुठा नदीचा जणू काय वेढा पडलेला आहे. मुळामुठा नदीला अगदी बारमास उदंड पाणी असते. त्यामुळे थेऊरला पाण्याची कधीच पंचाईत पडत नाही. नदीच्या डोहाला कंदबतीर्थ अथवा चिंतामणि तीर्थ असे नाव आहे.

श्री चिंतामणि हा डाव्या सोंडेचा गणपती आहे. मांडी घातलेले आसन आहे. मूर्ती अगदी रेखीव आहे. मूर्तीचे तोंड पूर्व



दिशेला आहे.गौतम ऋषीच्या अहिल्येची देवांचा इंद्र याने फसवणूक केली व आपली कामेच्छा पुरी केली. गौतम ऋषींना ही गोष्ट कळताच त्यांनी अहिल्या आणि इंद्र अशा दोघांनाही शाप दिला. अहिल्या शिळा होऊन पडली आणि इंद्राच्या अंगाला क्षते पडली. सर्व देवांना फार दु:ख झाले. त्यांनी त्या शापाबद्दल गौतमऋषीची विनवणी केली. गौतम ऋषींनी मग उ:शाप दिला. श्री गजाननाची आराधना केल्याने तुझ्या पापाचे क्षालन होईल असे त्याला सांगितले. बृहस्पतींनी इंद्राला गणेशमंत्र दिला. इंद्राच्या आराधनेमुळे श्री गजानन प्रसन्न झाले. त्यांनी त्याला आशीर्वाद दिला. त्यामुळे इंद्राचे रूप पालटले आणि तो पुन्हा पूर्ववत दिसू लागला.

हा गणपती, आपल्या मनात चिंतिलेले देतो म्हणून याचे नाव चिंतामणि असे पडले.

ह्या क्षेत्रासंबंधी दुसरी एक कथा सांगण्यात येते ती अशी - ब्रम्हदेवाने आपल्या चित्ताला स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणून चित्तवृत्तीचा प्रकाशक चिंतामणि याची आराधना केली. चिंतामणि प्रसन्न झाले आणि त्यांनी त्याला वर दिला. त्यामुळे ब्रम्हदेवाच्या चित्ताला स्थैर्य लाभले. ह्या प्रसंगाचे स्मारक म्हणून हे क्षेत्र प्रसिद्ध आहे. येथे साधकांच्या मोहजालाचे निराकरण होते. आणि त्यांना चित्तशांती लाभते.

योगसिद्धीचा लाभ होतो. आणि आत्मसाक्षात्कारही होतो. याच क्षेत्रात कौडिण्य ऋषींचा आश्रम होता. मोरया गोसावी यांनी सुद्धा येथील अरण्यात उग्र तपश्चर्या केली. याच ठिकाणी त्यांना सिद्धि प्राप्त झाली होती. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांची पत्नी रमाबाई ह्यांच्या येथील वास्तव्यामुळे ह्या क्षेत्राला विशेष महत्व आले.

पेशव्यांचे दैवत गणपती. परंतु श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांची ह्या श्री चिंतामणीवर विशेष भक्ती होती. राज्यकारभारातून थोडीशी जरी फुरसत मिळाली तरी विश्रांतीसाठी आणि मन:स्वस्थ्यासाठी, ते थेऊर येथील आपल्या वाड्यात येऊन रहात. ह्या चिंतामणीच्या सान्निध्यात राहूनच त्यांनी आपल्या अंगातील राजयक्ष्मा ह्या रोगाशी सामना दिला. आणि आपले प्राण त्यांनी शेवटी श्रीचिंतामणीच्याच चरणावर अर्पण केले. श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांच्या पत्नी रमाबाई ह्या त्यांच्या बरोबरच सति गेल्या. मुळामुठा नदीच्या काठावर सतीचे वृंदावन आहे. कार्तिक वद्य अष्टमीला दरवर्षी तेथे रमामाधव पुण्यतिथिला उत्सव साजरा केला जातो.

देवालयाच्या एका ओवरीमध्ये श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांचे तैलचित्र लावलेले आढळते.

थेऊरला ह्या श्री चिंतामणीचा उत्सव दरवर्षी, भाद्रपदातल्या चतुर्थीला फार मोठ्या प्रमाणावर साजरा केला जातो.

थेऊर गावी चिंतामणि । देवेन्द्रा जो वरदपाणी ।।
गौतमाची शापवाणी । ज्याच्या कृपें आटली ।।

## गिरिजात्मज - लेण्याद्री

लेण्याद्री हा डोंगर पुण्याच्या उत्तरेस कुकडी नदीच्या उत्तर-पश्चिम तीरावर आहे. ह्या डोंगराजवळ जाण्यासाठी मार्गातील कुकडी नदी पार करून जावे लागते. गावापासून हा डोंगर मैल-दीड मैल अंतरावर आहे.

पावसाळ्यात कुकडी नदी अगदी दुधडी भरून वाहात असते. त्यावेळी डोंगरावरील श्री गणपतीच्या दर्शनाला जाणे केवळ अशक्यप्राय ठरते.

डोंगरावरील लेणी फारच सुंदर आहेत. ह्या देवालयाच्या सभामंडपाची उंची फार कमी आहे. मंदिराच्या गाभा-यापुढील सभामंडप बराच मोठा आहे. त्यात कोरलेले पाषाणाचे सहा खांब असलेले दिसतात. मुख्य गाभारा बराचसा आतल्या बाजूला

आहे आणि तेथे बराच अंधार आहे.

ह्याच डोंगरातील एका गुहेमध्ये पार्वतीने तपश्चर्या



केली. श्री विनायक तेथे प्रगट झाले तेव्हा तिने तिथे श्री विनायकाची प्रतिस्थापना केली. परंतु ती जागा अतिशय अवघड अशा जागी आहे. त्यामुळे तेथे जाऊन त्या गणपतीचे दर्शन घेण्याचे काम महाकर्म कठीण ठरते.

असे सांगतात की, इतिहासकाळात एकदा नाना फडणविसांनी त्या बिकट जागेवर असलेल्या गणपतीचे दर्शन घेण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना दृष्टांत झाला आणि त्यामुळे तो आपला प्रयत्न त्यांना सोडून द्यावा लागला.

देवालयात गणपतीची स्वतंत्र अशी मूर्ती नाही. परंतु लेण्यातील एका भिंतीवर गणपतीचे बालरूप खोदून ठेवलेले आढळते.

लेण्याद्री गणपती तो हाच !

ह्या गणपतीसंबंधीची पुराणातली कथा अशी -

देवी पार्वती एकदा लेण्याद्रीच्या गुहेत बसलेली असताना गणपती आपला पुत्र व्हावा असे तिला वाटले. भाद्रपद शुद्ध चतुर्थीला तिने मातीची गणेशमूर्ती तयार केली आणि त्या मातीच्या मूर्तीचे ती चिंतन करू लागली, मग काय?


मातीची मूर्ती सजीव झाली. दिव्य तेजस्वी असा तो गणपती तिच्या पुढे आला. परंतु पार्वती आपल्या चिंतनात मग्न झाली होती. त्याने तिला जागे केले. पार्वती धन्य झाली.

गणपतीने तेथेच वास्तव्य केले. अनेक लीला करून दाखविल्या. अनेक राक्षसांचा गणपतीने नायनाट केला. पार्वती म्हणजे गिरिजा. त्या गिरिजेचा हा आत्मज म्हणून गिरिजात्मज

लेण्याद्रिच्या कडेकपारी । गिरिजात्मज तो वास करी ।
मातेसाठी गिरीकुहरी । पार्थिव देवत्व पावले ।।

## विघ्नेश्वर -ओझर

जुन्नरला जाताना सुमारे चार फर्लांगावर उजव्या बाजूस ओझर गावाकडे जायला फाटा फुटतो. देवस्थानाकडे जायला



कुकडी नदी पार करून जावे लागते.

श्री विघ्नेश्वराचे देवालय पूर्व दिशेकडे तोंड करून उभे आहे. देवालय चारही बाजूंनी दगडी तटाने बंदिस्त करून टाकलेले आहे. ह्या दगडी तटावरून चालण्यासाठी पायवाटही आहे.

देवाच्या मूर्तीसमोर दहा फुटी ऐसपैस मंडप आहे. मंडपाच्या दारातून बाहेर पडले की काळ्या पाषाणातला उंदीर आहे. ह्या मंडपाला लागूनच दुसरा ऐसपैस असा सभामंडप आहे. त्यापुढे आणखीन एक दहा फुटाचा सभामंडप आहे. त्याच्यापुढे दगडी फरशीचे विस्तृत पटांगण आहे. ह्या पटांगणात दोन दीपमाळा उभ्या आहेत. देवाळाचा घुमट मोठा कलाकुसरीचा आहे. त्यावर शिखर आणि सोनेरी कळस आहे. देवालयाचा परिसर फारच रमणीय आहे. देवालयाच्या मंदिरावरील शिखर चिमाजी अप्पांनी बांधले. वसईचा किल्ला जिंकून परत येत असतानाच, चिमाजी अप्पांनी ह्या देवालयाचा जीर्णोद्धार करविला.

श्रीमंत बाजीराव पेशवे हे देखील ह्या विघ्नेश्वाराचे महान भक्त होते. ह्या विघ्नेश्वारासंबंधीजी कथा सांगतात ती अशी -

एकदा इंद्राचा दरबार चालू असताना, तेथे नारदमुनीची स्वारी प्रगट झाली. त्यांनी इंद्राला असे निवेदन केली की, "हिमालयावर अभिनंदन नावाच्या राजाने यज्ञसभारंभ मांडला

आहे. त्या यज्ञात अभिनंदनाने, तुझा हविर्भात तुला देऊ केला नाही. आणि अशाप्रकारे त्याने तुझा अपमान केला आहे. हा असा अपमान तू का सहन करावास?" अपमान झाल्याचे कळताच इंद्र खूप संतापला. काळ नावाच्या राक्षसाला विघ्नासूर असे नाव इंद्राने दिले. आणि त्याच्याकडून त्या राजाच्या यज्ञाला विघ्न आणले. सा-या देवांमध्ये घबराट पसरला. सर्व देवांनी श्रीगणपतीची प्रार्थना केली.

श्री गणपती पार्श्व ऋषींचा पुत्र बनला आणि त्याने विघ्नासुराशी युद्ध आरंभले. त्या युद्धात गणपतीने विघ्नासुराचा पाडाव केला. विघ्नासूर गणपतीला शरण गेला. गणपतीने त्याला अभय दिले. आणि त्याच्याच विनंतीवरून गणपतीने, 'विघ्नेश्वर' हे नाव धारण केले.

देवांनी भाद्रपद शुद्ध चतुर्थीला, ओझरगावी गणपतीची स्थापना केली. तेव्हापासूनच ह्या देवाचे नाव विघ्नेश्वर असे पडले. ह्या देवालयातील विघ्नेश्वराची मूर्ती पूर्णाकृती आहे. देवाने मांडी घातलेली आहे. सोंड डावीकडे आहे. डोळ्यांत दोन माणके बसविली आहेत. कपाळावर हिरा बसविला आहे. आणि बेंबीत खडा आहे.

ओझरगावी विघ्नेश्वर । जय मारिला विघ्नासूर
तो मी नमिला रूपसुंदर । पिगलाक्ष गजानन ।।

## महागणपति - रांजणगाव

पुणे अहमदनगर मार्गावर, पुणे जिल्ह्यात, शिरूर तालुक्यात रांजणगाव आहे. इथले देवालय पूर्वेकडे तोंड करून उभे आहे. ह्या देवलयाची रचना अशी केलेली आहे की, उत्तरायन अथवा दक्षिणायन याच्या मध्यकालात, सूर्याचे किरण नेमके ह्या देवाच्या मूर्तीवरच पडत असतात.

देवालयातील सभामंडप इंदोरचे सरदार किबे यांनी बांधलेला आहे. पेशव्यांच्या पदरी असलेले सरदार पवार आणि सरदार शिंदे यानी येथील ओव-या बांधलेल्या आहेत. देवालयाच्या आतीलमूर्तीचा गाभारा आणि बाहेरील गाभारा श्रीमंत थोरले माधवराव पेशवे यांनी बांधलेला आहे.

देवलयातील पूजामूर्तीच्या खाली तळघरात एक लहानशी मूर्ती आहे. तीच खरी श्रीची मूर्ती आणि मूळं मूर्ती. परधर्मीयांच्या हल्ल्याच्या भीतीमुळे. मूळ मूर्ती अशा प्रकारे लपवून ठेवण्यात आल्याचे सांगतात.

त्या मूर्तीला दहा सोंडा आणि वीस हात आहेत असे म्हणतात. ती मूर्ती अगदी क्वचित् प्रसंगीच बाहेर काढण्यात येते. या मूर्तीचे ध्यानाला. 'महागणपतीचे ध्यान' म्हणतात. 'महोत्कट' असे ह्या गणपतीचे नाव आहे. असे सांगतात की अशाच ध्यानाची दुसरी एक मूर्ती, पेशवाईतील प्रसिद्ध कारभारी हरिपंत तात्या फडके यांच्या वंशजाकडे त्यांच्या पुण्याच्या वाड्यात ठेवलेली आहे.

ह्या देवालयाच्या नजीकच अशी एक विहीर आहे की, त्या विहिरीचे पाणी दुष्काळतही कधी आटत नाही.

देवालयातील महागणपती हा डाव्या सोंडेचा आहे. देवाने मांडी घातली आहे. मूर्ती मनोहर आहे. मूर्तीच्या दोन्ही



बाजूला रिद्धिसिद्धि ह्या दोघी उभ्या आहेत.

कथा अशी -

श्री गणपति एकदा प्रसन्न झाला आणि त्याने त्रिपूरासुराला वर दिला, पण त्यामुळे तो असुर मदमस्त बनला आणि त्याने चहूबाजूला पुंडाई करायला सुरवात केली.

देवांचा राजा इंद्र याला ढकलून तो स्वत:च त्या इंद्राच्या सिंहासनावर बसला. कैलासावर बसलेल्या श्री शंकराला त्याने सळो की पळो करून सोडले.

सगळीकडे असुरांचाच वरचष्मा. देवांना कुणीच विचारेना जीवन अगदी असह्य होऊन गेले. श्री शंकराला बरोबर घेऊन सर्व देव श्री गणपतीला शरण गेले.

गणपतीची आराधना करण्यासाठी नारदांनी आठ लोकांची गणेशस्तुती देवांना सांगितली. नारदकृत संकटनाशक

स्तोत्र ते हेच !

''प्रणम्य शिरसा देवं गौरीपुत्रं विनायकं ।
भक्तावासं स्मरेन्नित्यमायु: कामार्थसिद्धये ।।''

श्री गणपति प्रसन्न झाला. त्याने वर दिला.

देव- दैत्यांचे घनघोर युद्ध झाले. त्या युद्धात त्रिपुरासुर मारला गेला. दैत्यसैन्याचापुरा नि:पात झाला. सर्वत्र आनंदी आनंद झाला. मणिपूर नावाचे गाव वसविले. तेच आजचे रांजणगाव.

रांजणगावी गणपती । यशद झाला पित्याप्रती ।।
त्रिपुराची करी समाप्ती । शिव ज्याच्या प्रभावे ।।
महाराष्ट्री अष्टविनायक । त्याचे पायी नतमस्तक ।।
होऊनिया ग्रंथलेखक । देशभाषा बोलतो ।।

## तीर्थप्रसादातलं विज्ञान !

हिंदू संस्कृतीत मूर्तीला 'पंचामृती स्नान' हिं घातलं जातं. या स्नानाच पाणी तीर्थ म्हणून प्राशन करण्याची प्रथा आहे. अशा प्रकारे ते प्रसादाशी जोडलं असल्यामुळे 'तीर्थप्रसाद' असा शब्द तयार झाला आहे. पंचामृतामध्ये दूध, दही, तूप, साखर, आणि मध असे पाच पदार्थ असतात.

पावित्र्य आणि मांगल्य पाण्यात उतरत असल्याने त्या पाण्याला तीर्थांचा दर्जा प्राप्त होतो 'प्रसाद ' या शब्दाने आकाशाची निरभरता, पाण्याची निर्मलता आणि मनाची प्रसन्नता दर्शवली आहे. अन्नपदार्थ साधे असले तरी त्याचा नैवेद्य दाखवल्यानंतरची गोडी अवीट असते.

नैवेद्य देवाला दाखवतांना पुढील मंत्र म्हटले जातात. त्या मंत्रामध्ये विज्ञान भरल असल्याने सेवन केल्या जाणऱ्या प्रसादातही विज्ञान अंतर्भूत आहे असं म्हणाव लागेल.

प्राणाय नमः। अपानाय नमः। व्यानाय नमः।
उदानाय नमः। समानाय नमः। ब्रह्मणे नमः।

ऑक्सिजन, कार्बन डायऑक्साइड, नाइट्रोजन, पाण्याची वाफ या चार वायुंच्या एकत्र, योग्य प्रमाणाच्या ज्ञानाला नमस्कार असा त्या मंत्रांचा अर्थ आहे. ते पस्तीस हजार वर्षांपूर्वीचं असून ते ऋषी-मुनींना ज्ञात होते.

**संकलन- लिलाधर अभ्यंकर**

# दैवतांच्या उपासना

**आ**पापली कुलदैवते समजून घेतल्यानंतर, त्या दैवतांच्या उपासनेबद्दल 'धर्म व्यवहारात' काय म्हटले आहे, हे ही समजून घ्यावेसे वाटेल! त्या बद्दल थोडे असे




## शिव

शिवाला पाच प्रदक्षिणा घालाव्यात. साष्टांग नमस्कार घालावेत बाण अथवा लिंग हे शिव प्रतिक होय. श्रीरूद्र किंवा श्रीमहिम्नस्तोत्र याची शिवासमोर आवर्तने करावीत. शिवाला व दुर्गादेवीस तुळस निषिद्ध आहे. बेल तीस दिवसांपर्यंत शिळा होत नाही. शिवाला बेलाचे पान प्रिय आहे. धोतरा व कदंब शिवाला रात्री अर्पावी. देवाला फळ ठेवताना देठ देवाकडे असावे. माघकृष्ण चतुर्दशी- म्हणजे महाशिवरात्रीस उपवास करावा. श्री शिव देवतेसाठी

ॐ तत्पुरूषाय विद्महे महादेवाय धीमही ।
तन्नो रूद्र: प्रचोदयात् ।।
हा मंत्र १०८ वेळा म्हणावा.

## विष्णु



विष्णुला चार प्रदक्षिणा घालाव्यात. चार साष्टांग नमस्कार घालावेत. शालिग्राम हे विष्णूचे चिन्ह आहे. शालिग्रामाला अक्षदा वाहू नयेत. तुळस सात दिवस शिळी होत नाही. धोतरा व मंदार पुष्प तसेच अक्षदा विष्णूस वर्ज, म्हणून वाहू नये.

'ॐ नमो भगवते वासुदेवाय' या मंत्राचा किमान १०८ वेळा जप करावा. विष्णु सहस्त्रनामाचे नित्य पठण करावे. श्री सूक्ताची सोळा आवर्तने म्हणून कुलदेवतेस अभिषेक करावा. श्री विष्णुदेवतेचा -

'ॐ नारायणाय विद्महे । वासुदेवाय धिमही । तन्नो विष्णु: प्रचोदयात ।'

हा मंत्र १०८ वेळा म्हणावा।

# अभिजात संगीतकार : सुधीर फडके

सौ. वंदना घनश्याम गोडबोले

**म**राठी घराघरात आणि मनामनात सुधीर विनायक फडके हे नाव अजरामर आहे. गीत रामायणातील गोडव्यापासून ते भावविभोर करून सोडणा-या गीतांतून मराठी मनामनावर बाबुजींनी राज्य केले आहे. मराठी-हिंदी गीतांचे गायक व संगीतकार म्हणून त्यांनी ठसा उमटवला आहे. सलग पाच दशकांहून अधिककाळ त्यांच्या गीत आणि संगीताने कानसेनांना तृप्त केले आहे.

बाबूजींचा जन्म २५ जुलै १९१९ रोजी कोल्हापूर शहरातील एका वकिली व्यवसाय करणा-या कुटुंबात झाला. गायन आणि वादनाचे सुरूवातीचे शिक्षण त्यांनी पं. वामनराव पाध्ये यांच्याकडून घेतले.

कोल्हापूर सोडून मुंबईत आणि नंतर उत्तर भारतात दोन वर्ष दौरा करून त्यांनी मैफलींमध्ये सादरीकरण केले. यामुळे त्यांना वेगवेळ्या प्रांतातील लोकसंगीताचा व कलांचा जवळून अभ्यास करता आला. त्याचा वापर बाबूजींनी आपले संगीत खुलविण्यासाठी केला. त्यामुळे अल्पावधीतच त्यांची एक नावाजलेला गायक व संगीतकार म्हणून ओळख झाली.

सुधीर फडके यांनी सुमारे ११० चित्रपटांना संगीत दिले आहे. मराठी चित्रपटसृष्टीच्या जडण-घडणीत बाबूजींचे योगदान मोठे आहे. त्यांच्या काळातच मराठीने आपला सुवर्णकाळ अनुभवला. त्यांनी अनेक मराठी चित्रपटांना तर सुमारे २० हिन्दी चित्रपटांना संगीत दिले. याशिवाय अनेक भावगीते, भक्तिगीते आणि मराठी लावण्यांना त्यांनी आपल्या मधुर संगीताने सजविले आहे. अनेक दिग्गज गायकांच्या स्वरांना त्यांनी आपल्या संगीताच्या कोंदणात बसविले आहे. बाल गंधर्व, पं. भीमसेन जोशी, हिराबाई बडोदेकर, माणिक वर्मा, लता मंगेशकर, आशा भोसले, मोहम्मद रफी आणि मन्नाडे ही त्यातील काही नावे.



एचएमव्ही सोबत १९४१ मध्ये त्यांनी आपल्या चित्रपट कारकीर्दीची सुरुवात केली. त्यानंतर तब्बल पाच वर्षांनी प्रभात फिल्म कंपनीच्या व्ही. शांताराम यांनी त्यांना आपल्या चित्रपटांतून ब्रेक दिला. नंतर ही जोडी अनेक चित्रपटांतून दिसली. त्यांच्या काळातील संगीतकार- वसंत देसाई, वसंत पवार, स्नेहल भाटकर, दत्ता डावजेकर यांच्यात आपल्या सुमधुर संगीतामुळे बाबूंजीनी वेगळे स्थान संपादन केले.

गायक -संगीतकार असलेले सुधीर फडके यांच्यात एक चांगला अभिनेताही दडलेला होता. त्यांनी अभिनय केलेले अनेक चित्रपट म्हणूनच आजही रसिकमनाचा ठाव घेतात. त्यांचे सुहासिनी, आम्ही जातो आमच्यागावा. लाखाची गोष्ट, जगाच्या पाठीवर हे चित्रपट प्रचंड यशस्वी ठरले होते.

मराठी शिवाय हिंदी चित्रपटातील ‘भाभी की चूडिया’ या चित्रपटाचे 'ज्योती कलश छलके' हे पहाटगाणं आजही रसिकमनाचा ठाव घेते. 'पहली तारीख' या चित्रपटातील किशोरकुमार यांनी गायलेले 'खुश है जमाना आज पहली तारीख है' हे गीत रेडियो सिलोनवरून पहिल्या तारखेला वाजत आलं आहे.

महाराष्ट्राच्या घराघरात बाबूजी जाऊन पोहोचले ते 'गदिमांच्या' गीत रामायणामुळे. या रामायणातील ५६ गीतांसाठी त्यांनी दिलेले संगीत आणि केलेले गायन एक वेगळाच प्रयोग आहे. त्यांनी गीत-रामायणाचे देश-विदेशात १८०० कार्यक्रम केले. आकाशवाणीवर सर्वाधिक लोकप्रियता मिळविलेला हा एक वैशिष्ट्यपूर्ण कार्यक्रम ठरला आहे.

चित्रपट निर्मितीच्या क्षेत्रातही त्यांनी योगदान दिले आहे. स्वातंत्र्यलढ्यातील थोर सेनानी तात्याराव तथा विनायक दामोदर सावरकर यांच्यावरचा 'वीर सावरकर' चित्रपट बनविण्यासाठी त्यांनी कूपन्स विकून आणि कार्यक्रम करून निधी गोळा केला होता.

त्यांनी दिलेल्या संगीत सेवांसाठी त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. त्यात स्वामी हरिदास सन्मान, सूरसिंगार सांसद पुरस्कार, जीवनगौरव पुरस्कार, लता मंगेशकर पुरस्कारांचा समावेश आहे. १९९१ मध्ये संगीत नाटक अकादमी पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनातर्फे मुंबईच्या फिल्मसिटीला दादासाहेब फाळके चित्रनगरी नामकरण सोहळ्यात त्यांना विशेष सन्मानित करण्यात आले होते.

संगीतकार खय्यामही त्यांच्या संगीताच्या मधुरतेने प्रभावित झाले आहेत. २९ जुलै २००२ रोजी त्यांचे निधन झाले. त्यांनी संगीत क्षेत्रासाठी दिलेले योगदान निश्चितच उल्लेखनीय आहे.

**संगीतकार** - बाबूजींनी एकूण १११ चित्रपटांना संगीतबद्ध केले. त्यापैकी २१ चित्रपट हे हिंदी भाषेतील आहेत. त्यापैकी काही गाजलेले चित्रपट पुढीलप्रमाणे :

गोकुळ (१९४६), आगे बढो (१९४७), सीता स्वयंवर (१९४९), अपराधी (१९४९), जय भीम (१९४९), माया बाजार (१९४९), राम प्रतीज्ञा (१९४९), संत जनाबाई (१९४९), श्री कृष्ण दर्शन (१९५०), मालती माधव (१९५१), मुरलीवाला (१९५१), पहली तारीख (१९५४), रत्न घर (१९५४), शेवग्याच्या शेंगा (१९५५), देवघर (१९५६), सजनी (१९५६), गज गौरी (१९५८), गोकुल का चोर (१९५९), भाभी की चूडियां (१९६१), प्यार की जीत (१९६२), एकटी (१९६८), आधार (१९६९), दरार (१९७१), शेर शिवाजी (१९८१), रुक्मिणी स्वयंवर, आम्ही जातो आमुच्या गावा, पुढचे पाऊल, जगाच्या पाठीवर, सुवासिनी, प्रपंच, मुंबईचा जावई.

**गायक-** एक गायक म्हणून बाबूजींनी अनेक हिंदी व मराठी चित्रपटांमध्ये पार्श्वगायन केले. त्यापैकी काही अतिशय गाजलेली गीते पुढीलप्रमाणे :

देहाची तिजोरी, उठ उठ पंढरीनाथा, नवीन आज चंद्रमा, बाई मी विकत घेतला शाम, स्त्री जन्मा ही तुझी कहाणी, बोलत नाही वीणा, धीरे जरा गाडीवाना, आकाशी झेप घे रे पाखरा, वज्र चुड्याचे हात जोडता, यशवंत हो जयवंत हो, लाडकी शकुंतला, मानवतेचे मंदिर माझे, जग हे बंदीशाळा, देवातुला दया येईना कशी, देव देव्हा-यात नाही, विठ्ठला तू वेडा कुंभार, तुझे रूप चित्ती राहो, कुठे शोधीसी रामेश्वर, तुज सगुण म्हणू की निर्गुण रे, तुझे गीत गाण्यासाठी, अशी पाखरे येती, प्रिया आज माझी नसे साथ द्याया, सखी मंद झाल्या तारका, अंतरीच्या गूढ गर्भी, स्वर आले दुरूनी, दिसलीस तू फुलले ऋतु, तोच चंद्रमा नभात, डाव मांडून मांडून मोडू नको.

**गीतरामायण** - सुधीर फडके यांच्या कारकीर्दीतील मानाचा बिंदू म्हणजे त्यांनी स्वरबद्ध केलेले गदिमांचे गीतरामायण, गीतरामायणात एकूण ५६ गाणी आहेत. त्यामध्ये गदिमांनी रामायणातले सर्व प्रसंग अतिशय ओघवत्या भाषेत, वर्णिले आहेत.

गीतरामायणाचे आजपर्यंत हिंदी, गुजराथी, कन्नड, बंगाली, आसामी, तेलगु, मल्याळी, संस्कृत, कोकणी अशा विविध भाषांमध्ये भाषांतर झालेले आहे. या सर्व भाषांतरांचे वैशिष्ठ्य म्हणजे भाषांतरकर्त्यांनी एका मात्रेचाही फरक केलेला नाही. ही सर्व भाषांतरे मूळ बाबूजींनी दिलेल्या चालीवरच गायली जातात.

बाबूजींनी स्वत: त्यांच्या आयुष्यात गीतारामायणाचे जवळजवळ १८०० प्रयोग केले. हे प्रयोग त्यांनी देशात तसेच परदेशात केले आहेत.

**पुरस्कार-**

१. राष्ट्रपती पदक (१९६३) - हा माझा मार्ग एकला या चित्रपटासाठी.
२. सह्याद्री स्वररत्न पुरस्कार (२००१)
३. दिनानाथ मंगेशकर पुरस्कार (१९९८)
४. लता मंगेशकर पुरस्कार (२००१)
५. आल्फा जीवन गौरव पुरस्कार (२००१)

■■■■■


# साईबाबांचे देवस्थान- शिर्डी

सौ. स्नेहलता अभ्यंकर



## साईबाबांचे पहिले दर्शन

महाराष्ट्रात औरंगाबाद जिल्हा आहे. तिथल्या एका खेड्यात चांद पाटील राहात असे. एकदा त्याचा घोडा जो चरायला गेला तो परत आलाच नाही. चांद पाटील ठिकठिकाणी जाऊन त्याचा शोध करू लागला. असा शोध करता करता एके ठिकाणीं फकिराच्या वेषातला सोळा वर्षांचा एक सुंदर तरूण मुलगा त्याला दिसला. त्यानेच चांदभाईला विचारले, "पाटील, काय शोधता आहांत ?"



"माझा घोडा हरवलाय. तो शोधतोय",चांदभाई म्हणाला.

चांदभाई ज्या बाजूने आला होता तिकडे एक कुंपण होते. त्याचेकडे बोट दाखवून तो तरूण फकिर म्हणाला.

"अहो, मग त्यासाठी इतके शोधायला कशाला हवे? तो काय, कुंपणापलिकडे चरतोय्."

चांदभाईने पाहिले तो त्या तरूणाच्या सांगण्याप्रमाणे घोडा तिथे दिसला. या फकिराने आपल्याला पाटील म्हणून कसे ओळखले व नेमका आपलाच घोडा ओळखून त्याचा ठावठिकाणा कसा सांगितला याचे चांदभाईला मोठे आश्चर्य वाटले. त्याच्या मनाने पक्के घेतले की हा कुणी तरी थोर महात्मा आहे. चांदभाईने ही गोष्ट लोकांना सांगितल्यावर त्या तरूणाची कीर्ति तिथल्या लोकांत पसरू लागली.

पुढे चांदभाईच्या घरी एक लग्न निघाले. त्या लग्नाची वरात औरंगाबादेहून शिर्डी (जिल्हा अहमदनगर) येथे यावयाची होती. चांदभाईच्या वरातीबरोबर तो तरूणही निघाला. वरात शिर्डीला आल्यावर तिथले खंडोबाचे देऊळ लागले. म्हाळसापति हे त्या देवळातील पुजारी होते. वरातीतील त्या तरूण फकिराला पाहिल्याबरोबर म्हाळसापतींच्या मनात एकदम आदर उत्पन्न झाला व त्यांनी आपण होऊन "आवो साईबाबा" असे म्हणून फकिराचे स्वागत केले. तेव्हापासून (सन १८५४) तो तरूण शिर्डीसच राहू लागला व लोक त्याला 'साईबाबा' असेच म्हणून लागले. परंतु या साईबाबांचे मूळ नाव गाव काय हे मात्र शेवटपर्यंत कुणालाही कळले नाही.

साईबाबा शिर्डीस येऊन राहिल्यानंतर त्यांचा थोरपणा व साधुवृत्ति लोकांना हळूहळू कळू लागली, व तसतसे अनेक निष्ठावंत भक्त त्यांचे भोंवती जमले. परंतु सुरूवातीस फारच थोड्या लोकांना बाबांची योग्यता कळली, आणि ती कळली याचे कारण ते लोक स्वत:च साधु होते. म्हणून साधु गंगागीर गावक-यांना म्हणाले, "हे केवल रत्न आहे. याची योग्यता फार मोठी आहे. या गांवाचें फार मोठे भाग्य की हे रत्न तुम्हाला लाभले." तसेच आनंदनाथ म्हणाले, "हा हिरा आहे. याची खरी किंमत तुम्हाला आता कळणार नाही. ती तुम्हाला काहीं वर्षांनीं कळेल. "

साईबाबा ज्यावेळीं शिर्डीस आहे तेव्हा शिर्डी हे अगदी मागासलेले लहानसे खेडेगाव होते, परंतु बाबा येथे राहू लागल्यापासून त्यांची कीर्ति जसजशी पसरू लागली तसतसे शिर्डी गावही सुधारू लागले. महाराष्ट्रातील पंढरपुराप्रमाणेच शिर्डी हे क्षेत्र झाले.

हजारो नव्हे, लाखो माणसे दरवर्षी तिथे येऊन बाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन जातात. बाबा प्रत्यक्ष असताना ज्या प्रकारचे अनुभव भक्तांना येत, तसे अनुभव अजूनही शिर्डीस व इतर ठिकाणी येतात. असे हे थोर संत साईबाबा सुमारे ६८

वर्षांपूर्वी होऊन गेले. बाबांचे थोरपण कशात होते व भक्तांना त्याचा अनुभव वेळोवेळी कसा येत असे हे आपण आता पाहू.

म्हाळसापति व काशीराम शिंपी हे साईबाबांचे पहिले भक्त होत. त्यांनी बाबांची राहाण्याची सोय एक जुन्या मशिदीत करून दिली. बाबांनी त्या मशिदीला 'द्वारकामाई' असे नाव दिले. शिर्डीला येणा-या हजारो-लाखो लोकांना बाबांचे दर्शन इथेच होई. शिर्डीला पुढे अनेक नवीन इमारती झाल्या पण बाबा मात्र हयातभर द्वारकामाईतच राहिले. त्यामुळे या जागेला अतिशय पवित्रपणा आलेला आहे.

म्हाळसापति बहुतेक वेळ बाबांजवळ असत व त्यांची सेवा करीत. काशीराम बाबांना रोज दक्षिणा देई व इतर वस्तुही बाबांना पुरवी. एकदा तो कामधंद्यासाठीं बाहेरगावीं जात असता त्याला चोरांनी गाठले व बडविण्यास सुरूवात केली. मारामुळे तो बेशुद्ध पडण्याची वेळ आली. एकीकडे तो कळवळून बाबांची आठवण करीतच होता. हे होत असता बाबा शिर्डीत मोठमोठ्याने ओरडत होते. अर्थात् त्यांना काशीरामवरचा प्रसंग कळला होता. त्यांनी काशीरामाला ऐवढे बळ दिले की त्याने सगळ्या चोरांना पिटाळून लावले. बाबांच्या कृपेचा हा स्पष्ट पुरावा होय.

पुढे लवकरच शिर्डीचे माधवराव देशपांडे यांची बाबांवर भक्ती जडली. हे बाबांच्या सेवेत पूर्णपणें रंगले. बाबा त्यांना 'शामा' म्हणत व कुठेही आपल्याऐवजी त्यांना पाठवीत. श्री कृष्णाला जसा अर्जुन त्याप्रमाणे बाबांना हे माधवराव देशपांडे होते.

नानासाहेत चांदोरकर हे सरकारी नोकरीत मोठ्या हुद्यावर होते. तेहीं बाबांचे एकनिष्ठ भक्त झाले. संत दासगणू महाराज हे तर बाबांच्याच उपदेशाने भक्तिमार्गाकडे वळले व थोर कीर्तनकार झाले. या दोघांनीच साईबाबांची कीर्ति ठिकठिकाणी पसरविली.

शिर्डीला प्रथम साठे यांनी वाडा बांधला. त्यामुळे यात्रेकरूंची थोडी सोय झाली. पुढे हरी सीताराम दीक्षित यांनीही वाडा बांधला. त्यामुळे आणखी सोय वाढली. परंतु नागपूरचे गोपाळराव बुटी यांनी एक प्रचंड दगडी वाडा बांधला. या वाड्यातच बाबांचे समाधिमंदिर आहे.

श्रीमती राधाकृष्णमाई यांनी शिर्डीस येऊन साईबाबांच्या सेवेस वाहून घेतले. आठदहा वर्षांत त्यांनी सतत परिश्रम करून शिर्डीची खूपच सुधारणा केली. काकड आरती, शेजारती, इत्यादि रोजचे कार्यक्रम त्यांनीच सुरू केले व शिर्डीला संस्थानाचे स्वरूप प्राप्त करून दिले.

बाबा सबंध दिवस द्वारकामाईत असत. तिथून जवळच लेंडीबाग नावाचे फड्यानिवडुंगानी भरलेले एक दाट जंगल होते. तिथे जाऊन बाबा योगसाधना करीत. बाबांपुढे अनेक भक्त येऊन त्यांना दक्षिणा देत, व ती सर्व दक्षिणा बाबा गोरगरिबांना वाटून टाकीत. बाबा रोजचे जवळजवळ पाचशे रूपये या प्रमाणे वाटीत. तिथे जमलेल्या लोकांना बाबा गोष्टी सांगून बोध करीत. येणा-या प्रत्येक माणसाच्या मनात काय आहे हें बाबा अचूक ओळखीत व त्याप्रमाणे त्याला सांगत. पुढे घडणा-या गोष्टींचेही ज्ञान बाबांना असे. त्याप्रमाणे लोकांना ते सावध करीत. बाबांचे शिक्षण कुठे व किती झाले होते ते माहीत नाही. परंतु ते वेद- उपनिषदातील गोष्टी जशा सहज सांगत तशा कुराणातल्या गोष्टीही सांगत. गीतेतील प्रत्येक शब्दाची फोड बाबा अतिशय कौशल्याने करीत.

शिर्डीत बाबांची पूजा करण्यासाठीं चांगलीं फुले नव्हती. त्यामुळे रानटी फुलांनी पूजा करावी लागे. हे पाहून बाबांचे एक प्रेमळ भक्त पुरंदरे काका यांनी मुंबईहून सुवासिक फुलझाडांची बरीच रोपे शिर्डीस आणली. परंतु अशी नुसती झाले लावून शोभा वाढविणे बाबांना पसंत नव्हते. त्यांना ख-या भक्तीने शिर्डी गजबजायला हवी होती. म्हणून रोपे लावण्यास बाबा परवानगी देत ना ! असे तीन दिवस निघून गेले, व रोपे पार सुकून गेलीं. पुरंदरे मोठमोठ्याने रडू लागले. तेव्हा बाबांना दया आली व केवळ काकांच्या समाधानासाठी बाबांनी परवानगी दिली. बाबा म्हणाले, "काका, रोपे सुकली असली तरी ती जगतील. जा, आत्ताच्या आत्ता लावून टाका. " याप्रमाणे चार दिवसानंतर रोपे लावलीं गेली व ती जगलीही. आज शिर्डीस जी अनेक फुलझाडे दिसतात त्यांची सुरूवात अशी बाबांच्या कृपेने झाली आहे.

द्वारकामाईमधून लेंडीबागेकडे जाताना वाटेत एक लिंबाचे झाड आहे. त्याच्याखाली भुयार असून त्यात एक समाधि आहे. बाबांनीच ही जागा दाखवली व ते म्हणालें कीं, "ही माझ्या गुरूची समाधि. मी इथे बसून बारा वर्षे तप केले आहे" बाबा रोज लेंडीवर जाताना या समाधीस मोठ्या प्रेमाने नमस्कार करीत.

बाबा रोज हंडीभर प्रसाद करीत व भक्तांना वाटीत. हाच बाबांचा गोपाळकाला. यासाठी लागणा-या वस्तू बाबा स्वत: वाण्याकडे जाऊन व भाव करून विकत आणीत.

व्यवहाराविषयी बाबा कसे दक्ष असत याबद्दलची एक गोष्ट. एकदा एका बाईने बाबांना विकायला सीताफळे आणलीं. बाबांनी भाव करून त्यांची दहा आणे किंमत ठरवली. नंतर दुसरी बाई तेवढीच सीताफळे घेऊन आली. बाबांनी त्यांची किंमत सहा आणे ठरवली. पण शेवटी दोघींना एक एक रूपया देऊन टाकला. म्हणजे बाबांना व्यवहार चोख कळत असे. पण गरीबांना देताना मात्र ते भरपूर दाम देत.

बाबांना घरचा व शरीराचा मुळीच मोह नव्हता. ते रोज पाच घरी जाऊन भिक्षा मागून आणीत व तेवढी त्यांना पुरत असे.

द्वारकामाईंत दीड वीत रूंदीची एक फळी टांगलेली असे. त्या फळीवर बाबा झोपत. पण तिथे ते कसे चढत व तिथून ते कसे उतरत हे मात्र कुणालाही दिसले नाही.

बाबा हे अलौकिक शक्तीचे महात्मा होते. परंतु ते स्वत:ला ईश्वराचा बंदा सेवक म्हणवीत असत. आपल्या हातून जे चमत्कार घडतात ते देव आपल्याकडून घडवितो व त्या देवाच्या लीला होत, असे ते सांगत. म्हणून बाबांनी स्वत:ला गुरू मानून आपले शिष्य केले नाहीत.

बाबा दररोज द्वारकामाईत व गावातील इतर देवळात दिवे लावीत. यासाठी ते तेली व वाणी यांच्याकडून तेल मागून आणीत. त्यावेळी गावातील लोक बाबांना एक वेडा फकीरच समजत. तेली-वाणी यांनी काही दिवस या वेड्या फकिराला गंमत म्हणून तेल दिले. पण पुढे त्यांना याचा वीट आला, व ह्या वेड्याची जिरवावी म्हणून त्यांनी त्याला तेल देण्याचे नाकारले. बाबा काही न बोलता द्वारकामाईंत परत आले. त्यांनी तेलाच्या टमरेलात थोडे पाणी घातले व ते पिऊन टाकले. जणू त्यांनी हृदयातल्या ईश्वरालाच संतुष्ट केले. मग त्यांनी तेच टमरेल भरून पाणी घेतले व ते पणत्यांत ओतले. नंतर त्यात काकडे घालून त्यांना काडी लावली. को काय आश्चर्य ! त्या नेहमीप्रमाणे पेटू लागल्या. गावकरी लोक तिथे जमून बाबांचे हे वेडे चाळे पहात होते. ते या प्रकाराने थक्क झाले. त्या रात्री पणत्या रात्रभर जळत राहिल्या. एकदा शिर्डी गावावर महामारीची साथ आली. गावकऱ्यांनी बाबांकडे गाऱ्हाणे नेले. तेव्हा बाबांनी सूपभर गहू घेऊन, देवाचे नाव घेत, ते गहू स्वत:च्या हाताने दळले, व ते पीठ वेशीवर नेऊन टाकण्यास लोकांना सांगितले. लोकांनी तसे करताच महामारी निघून गेली.

पुढे एकदा संध्याकाळी आभाळ ढगांनी गच्च भरले. काळोख पडला. सोसाट्याचा वारा सुटला. विजा चमकून मेघांचा भयंकर गडगडाट सुरू झाला. थोड्याच वेळात जोराजोराने गारा पडून गूरें- माणसें हैराण झाली व घरावरची कौलेही फुटली. लवकरच मुसळधार पाऊस सुरू होऊन सगळीकडे पाणीच पाणी झाले. लोक हवालदील झाले व बाबांकडे धावले. झाल्याप्रकाराने बाबांना दया आली. बाबांजवळ नेहमी हातभर लांबीचा दांडका असे. त्याला ते 'सटका' म्हणत. बाबा सटका हातात घेऊन मशिदीच्या दरवाज्यावरी आले, व आकाशाकडे पहात व तोंडाने काही मंत्र पुटपुटत हातातील सटका मोठमोठ्याने खांबावर मारू लागले. तेव्हा थोड्याच वेळात वारा व पाऊस पूर्णपणे थांबला.

तसेच मशिदीत एकदा भर दुपारी धुनीतील आग भडकली, व मशिदीच्या आढ्यापर्यंत ज्वाळा पोचल्या. त्याहीवेळी बाबांनी अग्नीला हुकूम करून ती आग शांत केली.

साईबाबा आपल्या भक्तांचीं दुखणीही आपल्या अंगावर घेत व ती स्वत: सोसून भक्तांना त्यातून सोडवीत. अमरावतीचे दादासाहेब खापर्डे यांची पत्नी आपल्या मुलाला घेऊन शिर्डीस बाबांच्या दर्शनाला आली होती. तिथे असतानाच मुलाला प्लेग होऊन तो तापाने विव्हळू लागला. आईला काहीं सुचेना. ती केवळ बाबांचा धावा करीत होती. शेवटीं हताश होऊन तिने बाबांना विचारले, "बाबा, मी काय करू? मुलाला घेऊन घरी जाऊ का?" बाबा म्हणाले, "आई, मुलाची काळजी तू कशाला करतेस? तू माझी आठवण केलीस तेव्हापासूनच त्याचा ताप नि गाठी मी घातल्या आहेत. आता त्याला काही धास्ती नाही. हे बघ." असे म्हणून बाबांनी आपल्या खाकेतल्या अंड्याएवढ्या गाठी दाखविल्या. पुढे तो मुलगा लवकरच बरा झाला.

बाबांचे एक भक्त गोपाळराव गुंड यांच्या मनात एकदा असे आले कीं, शिर्डीस रामनवमीनिमित्त दरवर्षी एक यात्रा भरवावी व रामजन्माचा उत्सवही करावा. बाबांच्याही मनात ते होते. तेव्हा या गोष्टीस बाबांची तात्काळ संमती मिळाली. या प्रमाणे सन् १९११ साली उत्सव व जत्रा सुरू झाली. या गोष्टी वाढत्या प्रमाणावर आजपर्यंत चालू आहेत. या उत्सवानिमित्त हजारो माणसे शिर्डीस जमतात. तीन दिवस कीर्तन होते व शेवटी गोपाळकाला होतो.

गोकुळाष्टमीला श्रीकृष्णजन्माचा उत्सवही थाटाने साजरा केला जातो. यावेळीं दहीहंडीचा खेळ होतो. तसेच कुस्त्यांचे फड होऊन बक्षिसे दिली जातात. शक्तीची जोपासना करणे व लोकसंग्रह करणे ही जी श्रीकृष्णाची वैशिष्ट्यें ती या उत्सवामुळे साधली जातात. याही उत्सवाचे शेवटी गोपाळकाला होतो. लोकात समतेची भावना वाढविणे हाच याचा उद्देश

आहे.

आषाढ पौर्णिमेला गुरूपौर्णिमा साजरी केली जाते. यावेळीं सर्व भक्त बाबांची विशेष प्रेमाने पूजा करीत असतात. स्वत: बाबा आपल्याला 'गुरू' म्हणवून घेत नसत. परंतु भक्त आपल्याच सुखासाठी ही पूजा करीत असतात. ठिकठिकाणचे नामवंत कलाकार यावेळी बाबांसमोर हजेरी देतात.

रामकृष्णादि थोर व्यक्तींचे उत्सव साजरे करण्यात बाबांचा हेतू लोकांना एकत्र आणणे हा होता. या निमित्ताने लोक भेदभाव विसरतात व आनंदाने एकमेकाशी मिसळतात. साईबाबांसारख्या महात्म्यांना समाजामध्ये बंधुभाव व समता वाढवावयाची असते, व त्यासाठीच ते असे उत्सव साजरे करतात.

बाबा हे परमात्म्याशी किंवा परमात्म्याच्या निरनिराळ्या रूपाशी अगदी मिसळून गेले होते. भक्तांनी जशी जशी इच्छा केली तसे बाबांनीं त्यांना दर्शन दिले. कधी राम तर कधी कृष्ण, कधी पांडुरंग तर कधी अक्कलकोटचे महाराज, कधी कोणी मौलवी तर कधी कोणाचे सद्गुरू अशा निरनिराळ्या स्वरूपांत बाबांनीं भक्तांना दर्शन दिले.

एकदा दासगणूं महाराज बाबांजवळ असताना त्यांना पंढरपूरला पांडुरंगाच्या दर्शनास जाण्याची इच्छा झाली. त्यांनी बाबांजवळ परवानगी मागितली. परंतु बाबांच्या मनात दासगणूंना पाठवायचे नव्हते. म्हणून बाबा म्हणाले, "अरे गणू, शिर्डी हेच आपले पंढरपूर. आपल्याला शिर्डी सोडून जाण्याचे कारणच नाही. "

दासगणूंचा बाबांवर मोठा विश्वास असे. ते विचार करू लागले की, शिर्डी हेच माझे पंढरपूर तर इथला पांडुरंग कोण? या विचारात ते मग्न झाले तोच बाबा त्यांना पांडुरंग स्वरूपात दिसू लागले. या प्रसंगावर दासगणूंचे एक सुंदर पद आहे. त्याची सुरूवात अशी :-

"शिर्डी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर ।।"

रमा म्हणजे रखुमाई, तिचा वर म्हणजे पति. अर्थात् रमेचा पति म्हणजे पांडुरंग, तुम्हीं हे पद अवश्य पाठ करा।

डहाणूला बाळासाहेब देव नावाचे मामलेदार होते. त्यांच्या बाबतीत घडलेली बाबांची गोष्ट आता सांगतो.

बाळासाहेबांच्या आईने काही व्रते केली होती. त्यानिमित्त श्रावण मासात ब्राम्हण भोजन घालायचे होते. बाळासाहेबांना वाटले की या समारंभाला बाबांनी स्वत: यावे. म्हणून दोन महिने अगोदर त्यांनीं बाबांना पत्र पाठवून आग्रहाचे निमंत्रण केले. बाबांनी उत्तर धाडले की, "मी आणखी दोघांना घेऊन भोजनास येईन."

आषाढात एक सन्यासी बाळासाहेबांकडे आला. तो गोरक्षणासाठी फंड जमवीत होता, व त्या कामी त्याला बाळासाहेबांची मदत हवी होती. बाळासाहेब म्हणाले, "महाराज, गावात हल्लींच एक फंड जमवण्याचे काम चालू आहे. तर तुम्ही पुढे दिवाळीच्या सुमारास या. मग तुमच्या फं डाचे पाहू."

सन्यासी निघून गेला. पण पुढच्याच महिन्यात बाळासाहेबांकडे जेव्हा ब्राम्हणभोजन होते त्याच दिवशी तो परत आला. त्याला पाहून बाळासाहेबांना शंका आली की हा एका महिन्यानेच फंडाच्या कामासाठी आला की काय? बाळासाहेबांच्या बोलण्यावरून संन्याशाने त्यांच्या मनातील शंका ओळखली व तो म्हणाला, "साहेब, मी काही आज फंडासाठीं आलों नाहीं. आज मी भोजनासाठी आलो आहे."

बाळासाहेबांना आनंद झाला व ते म्हणाले, "वा! तर मग छानच झाले. आज आमचेकडे ब्राम्हणभोजन आहे. त्यात भाग घेण्यासाठी आपण आयतेच आलात. बसा."

संन्यासी म्हणाला, "पण माझ्याबरोबर आणखी दोघे आहेत. त्यांना धर्मशाळेत बसवून मी इथे आलो आहे."

"तर मग त्यांनाही घेऊन या. आम्हाला आनंदच वाटेल. "

संन्यासी त्या दोघांना घेऊन आला व जेवून गेला. परंतु कबूल केल्याप्रमाणे बाबा आले नाहीत म्हणून बाळासाहेबांना फार वाईट वाटले. त्यांनी आपले दु:ख बाबांना कळविले. बाबांनी लिहिले, "अरे, मी का तुला फसवले? कबूल केल्याप्रमाणे मी आणखी दोघांना घेऊन आलो व जेवून गेलो पण तू मला ओळखले नाहीस. माझा संशय घेतलास. म्हणजे संशयपिशाच्याने तुला फसवले."

हे वाचून बाळासाहेबांना अत्यंत वाईट वाटले. बाबा आपल्याकडे आले, पण आपण त्यांनां ओळखू शकलो नाही व म्हणून त्यांची पूजाही करू शकलो नाहीं. केवढे अभागी आपण त्यांनी बाबांना ताबडतोब पत्र लिहून क्षमा मागितली.बाबा चिरंजीव आहेत.

वरील गोष्टीप्रमाणे बाबांनी निरनिराळ्या भक्तांना मागच्या कित्येक जन्मांची ओळख दिली. अर्थात् बाबा पृथ्वीवर एकसारखे येत आहेत. महाराष्ट्रातील या महान संताने १५ अक्टोंबर १९१८ सालीं दसऱ्याचे दिवशी समाधी घेतली. परंतु त्यांनी असे सांगून ठेवले आहे-

जरी हें शरीर गेलों मी टाकून। तरी मी धांवेन भक्तांसाठी।।
नित्य मी जिवंत जाणा हेंचि सत्य। पहावी प्रीचीत अनुभवें।।

हा अनुभव अनेक भक्तांना आजही जगभर येत आहे. बाबांचे एक परम भक्त श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर हे प्रासादिक कवी होते. त्यांना बाबांनी 'हेमाडपंत' नाव ठेवले. बाबांच्या प्रेरणेनें हेमाडपंतांनी बाबांच्या हयातीतच त्यांचे चरित्र लिहिले. ते 'साई सच्चरित' म्हणून प्रसिद्ध आहे, ते आपण जरूर वाचावे व आपल्या मनोकामना पूर्ण कराव्यात. बाबांचा तुम्हां सर्वांना कृपाप्रसाद लाभो.

■■■■■

## महाराष्ट्राबाहेरील सुप्रसिद्ध गणेश मंदिरे

**गुजरात :**

अहमदाबादचे-भद्र गणेश मंदिर पेशवेकाळापासुन आहे; बडोदे येथील-सिद्धनाथ गणेश मंदिर,

गिरनार पर्वतातिल रेवती गणेश;

नवसारी जिल्ह्यातील सिसोद्रा येथे असलेले गणेशवड मंदिर. येथे वडाच्या झाडापासून ४०० वर्षापुर्वी गणपती प्रकटला अशी आख्यायिका आहे. या देवस्थानला औरंगजेबने इनाम दिले आहे;

दुर्गासारख्या असुराचे कूट करणारा व सोरटी सोमनाथ जवळचे दुर्गकुट गणेश मंदिर.

**मध्यप्रदेश :** इंदुर शहरातील बडे गणेश मंदिर- १२ फूट उचीची गणेशमूर्ती येथे आहे;

इंदूरपासून ६ कि.मी. अंतरावर मांडवगढ पासून जवळच प्रगारा क्षेत्रातील वक्रतुंड गणेश मंदिर;

उज्जैन येथील चिंतामणी गणेश मंदिर; नर्मदेचे उगमस्थान असलेल्या अमरकंटकाचा द्विभुज सिद्धीविनायक.

**बंगाल :** हुबळी नदीकिनारी असलेल्या वडनगर गावी अष्टभुजागणेशाचे प्रसिद्ध मंदिर आहे.

## कोणत्या देवाला किती प्रदक्षिणा घालाव्यात ?

**मा**रुती, शनि, शंकर या देवांना-११ प्रदक्षिणा घालाव्यात.
दत्ताला- तीन प्रदक्षिणा घालाव्यात.
गणेशाला- तीन, सात किंवा २१ प्रदक्षिणा घालाव्यात.
श्री विष्णू, श्रीकृष्णाला-आठ किंवा १२ प्रदक्षिणा घालाव्यात.
सूर्याला- १२ नमस्कार व १२ प्रदक्षिणा घालाव्यात.
देवीला- ८ किंवा ९ प्रदक्षिणा घालाव्यात.

वरिल प्रदक्षिणेच्या संख्यांचा देवतांच्या रुपाशी, कार्याशी, संख्येशी संबंध येतो. शंकर, मारुति म्हणजे रुद्र. रुद्र अकरा आहेत. शनि हा ग्रह रुद्रच आहे म्हणून त्यालाही ११ प्रदक्षिणा घालाव्यात.

दत्त त्रिगुणात्मक आहे, त्याला गणेशाला- तो तीन लोक व्यापून आहे म्हणून ३, सप्तलोक व्यापून आहे म्हणून ७ आणि भूलोक, भुवर्लोक व स्वर्लोक यातील प्रत्येकी सात उपलोक म्हणजे २१ उपलोक व्यापून आहे म्हणून २१ प्रदक्षिणा घालाव्यात.

श्री विष्णू व श्रीकृष्ण यांचा संबंध अष्टवसु, अष्टदलकमल अथवा अष्टविधा प्रकृतीचा अधिष्ठाता म्हणून ८ या संख्येशी त्यांचा संबंध येतो. तसेच ओम नमो भगवते वासुदेवाय हा द्वादशाक्षरी मंत्र आहे म्हणून १२ प्रदक्षिणा घालाव्यात. बारा महिन्याचे बारा आदित्य असतात म्हणून सूर्याला १२ नमस्कार व बारा प्रदक्षिणा घालतात. देवी ९, १८ या संख्येने शक्ति धारण करते किंवा अष्टधा प्रकृती आहे म्हणून ८ प्रदक्षिणा घालतात.

■■■■■

## हे आवर्जून करावे

- देव व गुरु यांना नमस्कार करताना डोक्यावरील टोपी काढावी.
- शिवपिंडीवरुन वाहून जाणारे तीर्थ न ओलांडता तीन चतुर्थांशच प्रदर्शित करावी.
- शिवपूजा करताना भस्मधारण व रुद्राक्ष धारण करावे.
- देवापुढे नारळ ठेवताना नारळाची शेंडी देवाकडे करावी.
- विष्णूला-तुळस; शंकराला-बेल; गणपतीला-दुर्वा, शमी, लाल फूल; देवीला- लाल फूल, हळद, कुंकू; सूर्याला-दूध, कमळ, पांढरे फूल प्रिय असतात. मारुती शनी यांना तेल प्रिय असते. मारुतीला शेंदूर, रुईच्या पानांची माळ प्रिय आहे.
- देवाला अनामिका बोटाने गंध लावावे.
- घराबाहेर जातांना जातांना घरातील देवांना व वडील माणसांना नमस्कार करावा.

# पक्षी परिक्षण - कोतवाल

**को**तवाल पक्षी हा साधारण ३१ से.मी. आकाराचा संपूर्ण काळ्या रंगाचा, सडपातळ, चपळ पक्षी आहे. कोतवाल संपूर्ण भारतभर आढळतो तसेच इराणसह, पाकिस्तान, बांगलादेश, म्यांनमार, श्रीलंका, चीन, इंडोनेशिया या देशांमध्येही याचे वास्तव्य आहे. कोतवालला इंग्रजीत 'ब्लॅक ड्रोंगों' किंवा 'किंग क्रॉ' म्हणतात. शास्त्रीय नाव 'डिक्रूरस मॅक्रोसेर्कस असून, डिक्रूरसचा अर्थ दुभंगलेली शेपूट असलेला असा होतो. नर-मादी दोघेही दिसायला सारखेच असतात. कोतवालची ही लांबलचक शेपूट त्याला हवेतून सुरकांड्या मारायला, झ ेपा टाकायला उपयोगी पडते. संस्कृत आणि हिंदीत याला भृंग (मोठा भंवरा) सारख्या काळा रंगावरून 'भुजंग' असेही नाव आहे. 'भुजं वक्रं गच्छति' म्हणजे हवेत विविध कसरती करून, कोलांटी सूर मारून, उडत्या कीटकांना फस्त करतो. गुरांच्या पाठीवर बसून गुरांच्या हालचालींमुळे उडणारे कीटक, गुराचे गोचड खात असल्यामुळे कोतवालला संस्कृत मध्ये 'ग्रोपेरक' असेही नाव आहे.



कोतवाल भल्या पहाटेपासून ते संध्याकाळी उशिरा पर्यंत सक्रिय असतात. यांचे मेनूकार्ड जरा मोठेच आहे. नाकतोडे, टोळ, सिकाडा नावाचे किडे, वाळवी, मधमाशा, मुंगे, पंखाच्या मुंग्या, पतंग, फुलपाखरे, चतूर, आळ्या असे कीटक तर मटकावतो.

वसंतात फुललेल्या पांगरा, पळस आणि काटेसावरच्या फुलातला मधुरसही आवडीने चाखतो. संध्याकाळी एखाद्या लाईटमुळे आकर्षित रातकिडे, कीटकांवरही ताव मारतो. एवढ्या उशिरापर्यंत सक्रिय असलेला हा एकमेव पक्षी आहे. क्वचितप्रसंगी धान्य, विंचू, गोमही खाल्ल्याची नोंद आहे. कधी अतिशय छोट्या पक्ष्यांची पिल्लंही फस्त करतो. जंगलात लागलेल्या आगीत किंवा शेतामध्ये राब सुरू असताना आगीची धग लागून उडणारे किडे टिपण्यासाठी कोतवालांची गर्दी होते.

एकदा तर तब्बल ३५ कोतवाल एकत्र मेजवानी लुटताना पाहण्यात आले आहेत. अशा आगीला आणि असह्य धुराला निसर्गात दुसरा कोणताही पक्षी इतक्या जवळ जाऊ शकत नाही. म्हणूनच संस्कृतमध्ये याला 'धूम्याट ' म्हणतात.कोतवालची वीण एप्रिल ते ऑगस्टपर्यंत असते. विणीच्या काळात नर-मादी दोघेही भल्या पहाटे गाणे गात असतात. मादीला आकर्षित करण्यासाठी कोतवाल वेगवेगळ्या चित्तथरारक हवाई कसरती करतात. पंख आणि चोच आपसात मिटून हवेतून जमिनीकडे जोरात सूर मारतात. जोडी जमल्यावर नर आणि मादी पूर्ण विणीच्या काळादरम्यान एकत्रच राहतात. घरट्यासाठी कोतवालचे आवडते झाड म्हणजे सदाहरित पानांनी आच्छादलेलं फणसाचे झाड. माळरानात किंवा शेतीजवळ सहज उपलब्ध आणि अनेक पक्ष्यांना यशस्वी विणीसाठी अतिशय सुरक्षित असे वृक्ष काटेरी बाभळी! घरट्यासाठी कडुलिंब व अन्य ५ ते १५ मीटरपर्यंतच्या उंचीचे

झाड निवडले जाते. काही घरटी बाभळीच्या फांदीच्या बेचक्यातच सुद्धा आढळतात.

घरटे बनवण्यासाठी पातळ काड्या गवतमुळे वापरून झाडाच्या नाजूक फांदीच्या बेचक्यावर गोलाकार वाटी नर-मादी दोघंही मिळून तयार करतात. या घरट्याचा आकार बाजूने पाहिल्यास उलटा शंकू आकार दिसतो. काटक्यांना चिकटवायला कोळ्यांच्या जाळ्यांचा उपयोग केला जातो. खोलगट घरट्यात खस-खस (वाळा) गवताची मुळे वापरली जातात. या खस-खसच्या मुळांवर पाण्याचे शिंतोडे उडल्यास मंद सुवास येतो. घरट्यांच्या आतील बाजूस चक्क घोड्याच्या केसांचे अस्तर दिले जाते ! घोड्यांचे केस उपलब्ध होत नसल्यास नाजूक गवताचे अस्तर दिले जाते. जेणेकरून अंड्यांतून बाहेर आलेल्या पिल्लांना काटक्या टोचू नये.

घरटे बनवायला नर-मादी दोघांना मिळून आठवडा लागतो. एप्रिलच्या पहिल्याच पावसात मादी घरट्यात अंडी घालते. साधारण तीन पांढ-या रंगाची भुरकट-तपकिरी ठिपके असलेली अंडी देते. क्वचित चार किंवा पाचही अंडीही असतात. एकाच घरट्यातली अंडी एका आकाराची नसतात. एक अंडे एक इंचाचे तर दुसरे त्यापेक्षा छोटे तिसरे त्याही पेक्षा छोटा !

दुसऱ्या कोतवालच्या घरट्यातही असते. पण प्रत्येक कोतवालच्या अंड्याच्या रंगात फरक असतो. नर-मादी दोघंही अंडी उबवतात, १४ ते १५ दिवसांच्या उबवणीनंतर पिल्लं अंड्यातून बाहेर येतात. पहिले पांच दिवस त्याना ऊब देण्यात येते. त्यानंतर पिल्लं स्वत:च्या शारीरिक तापमानावर राहू शकतात. घरट्यातून अंडी पळवली तर लगेचच मादी कोतवाल परत अंडी घालते. तेही मिलन न होता. वाढत्या वृक्षतोडीमुळे कोतवाल दूरध्वनीच्या किंवा लाईटच्या खाबांवर घरटे बनवायला लागले आहेत.

कोतवालच्या घरट्याची परीसीमा ०.००३ ते ०.०१२ चौरस किलोमीटर (०.३ ते १.२ हेक्टर) असते आणि तशी ही हद्द राखली जाते. या हद्दीत जर ससाणा, घारी, कावळा तसंच गरुडासारखा मोठा शिकारी पक्षी असल्यास त्यांचा वेगाने पाठलाग करून हुसकावून लावतो. त्याच्या या सवयीमुळे त्याला इंग्रजीत 'किंग क्रो' म्हणतात. कोतवालच्या या धीट स्वभावाचा फायदा दुस-या भित्र्या पक्ष्यांनाही होतो. म्हणूनच कोतवाल ज्या झाडावर घरटे करतो, त्या झाडाच्या आसपासच्या झाडांवर हळद्या, सुभग, सातभाई, ढोरकवडी, दयाळ, सळुंकी, होला, लालबुड्या बुलबुल अशा पक्ष्यांचीही घरटी सापडतात. एका अभ्यासावेळी कोतवालच्या आसपासच्या अन्य पक्ष्यांच्या एकूण ४० घरट्यांपैकी तब्बल १८ घरटी लालबुड्या बुलबुलचीच होती. लालबुड्या बुलबुलने कोतवालच्या पिल्लांना भरवल्याचीही नोंद आहे. अशाप्रकारे कोतवालच्या आक्रमक स्वाभावामुळे अन्य पक्ष्यांच्या घरट्याला रक्षण मिळते. एखाद्या गावाचा कोतवाल जसे गावातल्या लोकांचे रक्षण करतो तसा हा पक्ष्यांमधला कोतवाल! आहे की नाही नावाला सार्थक! काही वेळा कोकिळ ही कोतवालची अंडी खाली टाकून स्वत:ची अंडी देते.

आधीच्या विणीच्या काळात मोठी झालेली पिल्ले छोट्या भावंडांना भरवायला आपल्या आई- बाबांना मदत करतात. पिल्लांचे वजन ते १२ दिवसांचे होण्यापयंत सतत वाढत असते. चौथ्या दिवशी पिल्लांना बारीक पिसे यायला लागतात आणि आठ दिवसाचे झाल्यावर डोळे उघडतात. पिल्लं १६ ते १७ व्या दिवशी घरट्यातून बाहेर पडून उडायला लागतात. पण तीन आठवड्याचे होईपर्यंत त्यांना दुभंगलेली शेपूट येत नाही. आई-बाबा पिल्लं महिन्याची होईपर्यंत खाऊ घालतात, रक्षण करतात. नुकतीच मोठी झालेली तरुण कोतवाल खाण्यासाठी मोठ्या कोतवालकडे याचक बनून गेल्यास ते स्वावलंबी व्हावे म्हणून त्यांचेकडे दुर्लक्ष केले जाते, नाही ऐकल्यास हुसकावून लावतात. हे तरुण कोतवाल दोन वर्षांत पूर्ण वयस्क होतात. कोतवाल आपल्या पिल्लांना खाद्य मिळवायला शिकवतात. एखाद्या झाडांचे पान हवेत सोडतात आणि ते पान हवेतल्या हवेतच तरुण कोतवाल झेलतात. अशा हवाई कसरतींमुळेच यांना जगण्याचे प्रशिक्षण मिळते आणि हाच वारसा त्यांनी पुढच्या पिढीला द्यायचा असतो!

**साभार : दैनिक लोकसत्ता**


■■■■■

# पर्यावरण आणि आरोग्य



डॉ. संपदा अभ्यंकर

**बे**सुमार जंगलतोडीच्या अनेक परिणामांना तोंड देताना भूगर्भजलाची खालावत जाणारी पातळी ज्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणखी बिकट होणार आहे. शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसा सूर्यप्रकाश या सर्व सजीवांच्या मूलभूत गरजा आहेत. सुदैवाने भारतासारख्या समशीतोष्ण कटिबंधाच्या प्रदेशात निदान सूर्यप्रकाशाबाबत तरी प्रश्नचिन्ह नाही पण शुद्ध पाणी आणि शुद्ध हवा मग तो ग्रामीण भाग असो की शहरी, या प्रदूषित हवा आणि पाण्यामुळे अनेक आजाराच्या साथी पसरण्यास कितीसा वेळ लागणार ?




नुकताच जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. शिक्षक दिन, व्हॅलेंटाईन डे, मदर्स डे, फ्रेंडशिप डे असे अनेक दिवस आपण साजरे करत असतो. त्यात पर्यावरण दिन, आरोग्य दिन यांचाही समावेश आहे. पर्यावरण दिन साजरा करताना आपण पाहतो सरकारी पातळीवर किंवा अनेक संस्थांमार्फत वृक्षरोपणाचे कार्यक्रम केले जातात. त्याच्या बातम्या, छायाचित्रे वृत्तपत्रातून, दूरदर्शनवर दाखविल्या जातात. तो दिवस संपला. आपल्यालेखी त्याचे महत्त्व संपते. पण प्रत्याक्ष तसे आहे का ? पर्यावरणाची व्याख्या करायची झाली तर सृष्टीतील सजीव आणि निर्जीव घटक या दोन्हींचा समावेश होतो. म्हणजेच या ना त्या रुपात हे घटक मानवी जीवनाच्या दैनंदिन जीवनाशी निगडीत आहेत. कारण मानव हा सुद्धा त्या पर्यावरणाचाच एक भाग आहे. अधिक व्यापक स्वरुपात पृथ्वीवरील निसर्ग म्हणजेच पर्यावरण असे म्हणता येईल. एकपेशीय अमीबापासून ते महाकाय गेंडा, हत्ती, व्हेल हे सगळे या निसर्गाचाच भाग आहेत. तसेच अनेक त-हेच्या वनस्पतीही. मानव उत्क्रांत होत गेला, बौद्धिक विकास होत-होत आजचा आधुनिक मानव गगनाला गवसणी घालण्याच्या प्रयत्नात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानात थक्क करून सोडण्याइतकी प्रगती मानवाने केली आहे.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने पृथ्वीवरचे भौगोलिक अंतर अनेक अर्थाने कमी झाले आहे. पण त्याचबरोबर या आधुनिकतेचा वापर करताना तो निसर्गापासून तितकाच दूर चालला आहे. ग्लोबलायझेशनाच्या जमान्यात ग्लोबल वॉर्मिंग, ग्रीन हाऊस इफेक्ट, ओझोनचा थर, ध्रुवावरचे वितळणारे बर्फ, सागराचे किना-यावरच्या गावांमध्ये घुसणारे पाणी, अमाप जंगलतोड एक ना दोन अनेक कारणांनी पर्यावरणाचा समतोल ढासळतो आहे, त्याचे दृश्य स्वरुपातले परिणाम अनुभवास येत आहेत. पर्यावरणतज्ञ घसा फोडून याविषयी जागृति करण्याचा प्रयत्न करीत आहेत. आज ना उद्या याची झळ सामान्य जनावरांपर्यंत पोहोचण्यास वेळ लागणार

नाही. खरे तर काही प्रमाणात हे परिणाम जाणवूही लागले आहेत.

पर्यावरण आणि आरोग्य यांचा तसा बघायला गेला तर अगदी निकटचा संबंध. पर्यावरणातील हवा, पाणी, माती, सूर्यप्रकाश (तापमान) म्हणजेच पर्यायाने पंचमहाभूते (सर्वव्यापी आकाश) जे मानवी शरीरातही आहेत. साहजिकच वातावरणात कोणत्याही प्रकारचा बदल झाला तरी त्याचे दृश्य, अदृश्य परिणाम मानवी आरोग्यावर होतच राहतात. अगदी ओझोन थराचे उदाहरण घ्यायचे तरी अतिनील किरणे मानवी शरीरास घातक आहेत. अनेक प्रकारचे त्वचाविकार, त्वचेचा कर्करोग होऊ शकतो. म्हणूनच या अतीनील किरणांना शोषून घेणाऱ्या ओझोनची पातळी राखणे महत्वाचे. औद्योगिकरणाच्या रेट्यात कारखान्यातून बाहेर पडणारी रसायने, वाहनांमुळे वाढते प्रदूषण कार्बनडायऑक्साईड, सल्फर डायऑक्साईड आणि तत्सम विषारी वायू-श्वसनसंस्थेचे विकार वाढू नाही लागले तरच नवल. पार्टीक्युलेट पोल्युटंट्स किंवा स्मोग अपघातांचे वाढते प्रमाण हे कशाचे द्योतक आहे ?

बेसुमार जंगलतोडीच्या अनेक परिणामांना तोंड देताना भूगर्भजलाची खालावत जाणारी पातळी ज्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न आणखी बिकट होणार आहे. शुद्ध हवा, शुद्ध पाणी आणि पुरेसा सूर्यप्रकाश या सर्व सजीवांच्या मूलभूत गरजा आहेत. सुदैवाने भारतासारख्या समशीतोष्ण कटिबंधाच्या प्रदेशात निदान सूर्यप्रकाशाबाबत तरी प्रश्नचिन्हे नाही पण शुद्ध पाणी आणि शुद्ध हवा मग तो ग्रामीण भाग असो की शहरी. या प्रदूषित हवा आणि पाण्यामुळे अनेक आजाराच्या साथी पसरण्यास कितीसा वेळ लागणार ? पण सगळ्यात महत्त्वाचा मुद्दा आहे तो शेतीचा. वाढत्या लोकसंख्येची अन्नधान्याची गरज भागविण्यासाठी शेतीवरती अनेक प्रयोग केले गेले. पीक वाढविण्यासाठी रासायनिक खतांचा बेसुमार वापर तसेच त्यावर रोग होऊन नयेत म्हणून किंवा झाल्यावर करण्यात येणारा जंतू, कीटनाशकांचा वापर, सांडपाण्यावर घेतल्या जाणाऱ्या भाज्या या सगळ्याचा विचार करता क्वांटीटी-उत्पादन वाढले पण क्वालीटी-गुणवत्ता वाढली का हा संशोधनाचा विषय ठरले. मानवी अरोग्यास आवश्यक असणारी पोषके आहारातूनच (अन्नधान्यातूनच कारण प्राणीही शेवटी वनस्पतींचाच वापर करतात) मिळविली जातात. मुळातच अन्नधान्ये निकृष्ट प्रतीची असतील तर त्यापासून मिळणाऱ्या पोषकांची गुणवत्ता काय असेल ? कारण याच पोषकांपासून आजाराला दूर ठेवणारी रोगप्रतिकारक शक्ती निर्माण होत असते. नाहीतर वर्तमानपत्रात रोजच येणा-या 'कुपोषणाचे बळी' अशा बातम्या दिसल्या नसत्या.

आजूबाजूचे वातावरण- परिसर स्वच्छ ठेवणे, कच-याची, सांडपाण्याची योग्य विल्हेवाट लावणे हा ही पर्यावरणाचा महत्त्वाचा भाग आहे. कोणत्याही स्वच्छ ठिकाणी डास, माशा किंवा तत्सम कीटक, जीवाणू आढळत नाहीत. पण परिसर अस्वच्छतेमुळे मलेरिया, कावीळ, अनेक प्रकारचे ताप किंवा साथीचे आजार पसरण्याचा धोका असतो. यावर अनेक उपाययोजनाही केल्या जातात. पण हे उपाय बाह्य परिसरासाठी असतात. प्रत्येक पेशीचा स्वत:चा परिसर असतो. हा परिसर म्हणजे आहारातून घेतली जाणारी वेगवेगळया प्रकारची पोषणद्रव्ये. प्रत्येक पेशीचे ठराविक कार्य असते. त्या कार्यासाठी आवश्यक असणारे घटक हे अन्नातूनच मिळत असतात. शरीरांतर्गतही अनेक रासायनिक अभिक्रिया होत असतात. अनेक रासायनांची निर्मिती केली जाते. थोडक्यात निरोगी शरीरात अंतस्त्राव, पाचकरस आणि उत्सर्जन प्रक्रिया यामध्ये संतुलन असते. शरीरातील प्रत्येक पेशी ही सदृढ आणि निरोगी अवस्थेत नेमून दिलेले काम करतेच पण तिला स्वत:च्या शरीराची संपूर्ण ओळख, जडणघडण माहित असते. झाडाच्या एका पेशीत (बी मध्ये) संपूर्ण वृक्षाचा अराखडा असतो. तद्वत मानवाची निर्मिती ही एका पेशीतूनच होत असते. शरीरातील प्रत्येक पेशीला परिसराचे नुकसान न करता स्वत:चे कार्य प्रामाणिकपणे करत असते.

पण अयोग्य अन्नाचा कचरा शरीरात निर्माण झाला की वातावरणातील बदलामुळे शरीरात रोगजंतूचा प्रवेश होतो. त्यांचा नायनाट करण्यासाठी शरीर संरक्षक पेशी कामाला लागतात. हे रोगजंतू कितीही बलवान असले तरी शरीरातील रोग प्रतिकारक शक्ती चांगली असेल तर रोगजंतूचे आक्रमण रोखले जाईल. शरीरातील प्रत्येक अवयवात ही संरक्षणशक्ती जन्मत:च असते. म्हणजे मुळातच रोगप्रतिकारक शक्ती उत्तम असायला हवी. याकरता मातेचे भरण-पोषण योग्य असावयास हवे. माताच जर कुपोषित असेल तर साहजिकच जन्मास येणारे बालक ही जन्मत: अनारोग्य असलेले असू शकेल. निसर्गत: ही प्राप्त झालेली कवचकुंडले टिकविणे आपल्याच हातात असते. पण आधुनिकतेची कास धरत आपणच आपल्या पायावर कु-हाड मारून घेत नाही ना याचा विचार करावयास हवा. तंत्रज्ञान आधुनिक वाटले तरी बियाणे, खते किंवा जंतू अथवा कीटकनाशके असेंद्रिय न वापरता सेंद्रीय पदार्थांचा वापर केला तर मानवी आरोग्याला उपकारक ठरू शकेल

कारण खरेतर निसर्गाने हा ही समातेल उत्तम रितीने राखला आहे. निरनिराळ्या वायूंची चक्रे, नायट्रोजन, सल्फर, स्थिरीकरण करणारे जीवाणू, कुजलेली मृत शरीरे, पालापाचोळयाचे विघटन करणारे जीवाणू हे हा समतोल राखत असतात पण रासायनिक पदार्थांचा वापर यांचाही विनाश घडवून कदाचित असमतोलात भर टाकू शकेल.

वाढलेले तापमान उष्माघाताचे बळी किंवा थंडीची लाट आल्यावर, अतोनात बर्फवृष्टीने होणारे मृत्यू हा ही त्याचाच परिणाम आहे. पूर्वी ऋतु ही ठरल्यावेळी सुरू व्हायचे. आपण भारतात सहा ऋतू मानतो. इंग्रजी महिन्यानुसार मागे पुढे होत असतील, पण वर्षाऋतू साधारण जून अखेर ते ऑगस्ट पण आता असेही होऊ लागले आहे. जून, जुलै महिन्यात पावसाची नाममात्र हजेरी आणि सप्टेंबरपर्यंत लांबलेला पावसाळा. कधी डिसेंबर, जानेवारीत पडणारा पाऊस, अवेळी पडणारी किंवा लांबणारी थंडी, होळीच्या आधीच वसंतऋतूतच जाणवणारा उकाडा हे सगळे पर्यावरणाचा समतोल ढळल्याचे द्योतक आहे. विशिष्ट काळी विशिष्ट हवामान असेल याची खात्री देता येईल का ? आयुर्वेदानुसार या ऋतूंना अतिशय महत्त्व आहे. कारण त्यानुसार आहारविहारात बदल करून आरोग्य टिकविण्याचा प्रयत्न केला जातो. यासाठी ऋतुसंधीकालाचा विशेष विचार केला आहे. एका ऋतूतील विशिष्ट वातावरणाशी आपल्या शरीराचे थोड्याफार प्रमाणात साम्य झालेले असते. अशावेळी वातावरणात घडून येणा-या बदलाचा परिणाम शरीरावर त्वरेने घडून येतो. म्हणजेच नियमितपणे ऋतू बदल होतो तेव्हा पहिल्या ऋतूतला आहार कमी करुन दुसऱ्या ऋतूतला आहार क्रमश: घ्यावा लागतो. अशा पद्धतीने क्रमश: बदल घडवून आणला तरच स्वास्थ्य टिकू शकते. मागचेच वर्षाऋतूचे उदाहरण घ्यायचे तर जून- जुलैत अवर्षण असता आहार वर्षाऋतूचा न घेता ग्रीष्म ऋतूचाच घ्यावयास हवा.

म्हणजेच आहार आणि वातावरणातील बदल यांचा आरोग्याशी घनिष्ठ संबंध आहे. पण त्याचबरोबर आरोग्य म्हणजे केवळ शारीरिक अपंगत्व अथवा आजार नाही असे नाही. जागतिक आरोग्य संघटनेने केलेल्या आरोगाच्या व्याख्येनुसार 'शारीरिक, सामाजिक सुस्थिती म्हणजे आरोग्य.'

आत्तापर्यंत आपण फक्त पर्यावरणातील बदलामुळे शारीरिक आरोग्यवर काय परिणाम होतात ते पहिले जे दृश्य स्वरुपात दिसू शकतात. निव्वळ पर्यावरणच असे नाही तर आधुनिक जीवनशैलीचा अंगिकार करताना येणारा मानसिक ताणतणाव, समाजातली असमानता याचाही परिणाम आरोग्यावर होताना दिसतो. म्हणून नुसते दिवस साजरे करून किंवा पाठ्यपुस्तकाला पर्यावरण विषयाचा अभ्यासक्रम समाविष्ट करण्यापेक्षा शाळेतील मुलांचा किंवा युवा पिढीचा पर्यावरणाकडे बघण्याचा दृष्टीकोन आणि वृत्ती कशी बदलेल यासाठी प्रयत्न करायला हवेत. जाताजाता एक दूरदर्शनवर पाहिलेली जाहिरात आठवते. मुलगा सायकलवर आणि बाबा चार चाकीतून. पेट्रोल संपले तर ? असा मुलाचा प्रश्न. आज अनेक माध्यमे असल्याने सर्वच माध्यमातून पर्यावरण जागृती आणि आरोग्य याविषयी सजगता निर्माण करायला हवी. तरच आरोग्याची गुरूकिल्ली- खजिना असलेली एकमेव वसुंधरा आपण पुढच्या पिढ्यांना निरोगी स्वरुपात सुपूर्द करू शकू.

■■■■■

## उच्च व निम्न रक्तदाब- काही घरगुती उपचार

खसखस आणि टरबुजाच्या बियांचा गर वेग-वेगळे वाटून समप्रमाणात मिसळून ठेवावे. सकाळ संध्याकाळ रिकाम्या पोटी खाल्याने वाढलेला रक्तदाब कमी होण्यास मदत होते. रात्री झोप सुद्धा चांगली लागते.

एक चमचा मेथीच्या दाण्याचे चूर्ण सकाळ संध्याकाळ रिकाम्यांपोटी (एक आठवडा) घेतल्यावर उच्च रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

मनुका सोबत लसणाची पाखळी खाल्याने आराम येतो.

गहू आणि चणे समप्रमाणात घेऊन दळून घ्यावे. या पिठाच्या पोळ्या खाव्या, उच्च रक्तदाब कमी होण्यास मदत होईल.

रात्री एका तांब्याच्या भांड्यात पाणी भरुन ठेवावे. सकाळी उठून ते पाणी प्यावे. त्याने उच्च रक्त दाब सामान्य होतो.

तुळशीची चार पाने, लिंबाची चार पाने, दोन चमचे पाणी घेऊन एकत्र वाटावी. रिकाम्यापोटी घेतल्याने उच्च रक्तदाब कमी होण्यास मदत होते.

100 ग्रॅम किसमिस 200 ग्रॅम पाण्यात रात्रभर भिजवावी व सकाळी एक-एक किसमिस चांगली चावून चावून खावी. निम्न रक्त दाब सामान्य होतो.

ताकात दोन ग्रॅम हिंग मिसळून ताक धेतल्याने निम्न रक्त दाब सामान्य होतो. ताक दुपारी जेवणानंतर घेतल्यास उत्तम.

गाजराच्या रसात मध घालून घेतल्यास निम्न रक्त दाब सामान्य होतो तसेच गाजराचा मोरांबा खाल्यास लाभदायक आहे.

# औषधी रसायनांसाठी उपयुक्त तंत्र

शिल्पा विवेक अभ्यंकर



**र**सायनशास्त्रातील नोबेल यावेळी दिले गेले आहे ते निसर्गातील नव्या रासायनिक प्रकिया शोधणा-यांना किंवा त्या अधिक अचूकपणे करून मानवाला उपयुक्त होतील अशी संयुक्त रसायने तयार करणा-या त्रयीला. रिचर्ड हेक, इची नेगिशी व अकिरा सुझुकी यांनी रासायनिक क्षेत्रात केलेली करामत आरोग्यापासून इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत अनेक क्षेत्रांमध्ये उपयुक्त बदल घडवून आणणारी आहे.

या त्रयीने रासायनिक क्रियेने बनविलेले रसायन हे मुळात निसर्गात उपलब्ध होते. मात्र कृत्रिम रितीने ते तयार करणे हे मोठे आव्हान होते. थोडक्यात निसर्गाच्या कामगिरीची हुबेहुब प्रतिकृती त्यांनी प्रयोगशाळेत निर्माण केली. ८०च्या दशकात कॅरेबियन समुद्रांत स्कूबा डायव्हिंग करणा-यांना सुमारे १०० फूटाहून अधिक खोलीवर छोटा जीव मिळाला. या जीवाला डोळे, पोट, हाडे, तोंड काहीच नव्हते. हा अगदी प्राथमिक स्तरावरील जीव असावा असा सर्वांचा समज होता. परंतु, समुद्रातीलन विविध आव्हानांना तोंड देण्याची व शत्रूंपासून बचाव करण्याची त्याची क्षमता यामुळे शास्त्रज्ञांचे त्याच्याकडे लक्ष वेधले गेले. मग 'डिस्कोडर्मिया डिझोल्युटा' व त्याच्यासारखे अन्य जीव यांचा अभ्यास सुरू झ ााला. संयुक्त रासायनिक मॉलीक्यूल्स शरीरात बनविण्याची या प्राण्यांची क्षमता थक्क करणारी होती. ही रसायने विषारी होती व जीवरक्षणासाठी ते ती वापरीत होते. मात्र त्याचा दुसरा उपयोग असा की मानवासाठी ती औषध म्हणून अतिशय उपयुक्त होती.

अँटिबॉयोटिक्स, अँटिव्हायरल व वेदनाशमक म्हणून या रसायनांचा उपयोग होऊ शकतो असे आढलून आले. 'डिस्कोडर्मिया डिझोल्युटा' या प्राण्यामध्ये आढळलेले 'डिस्कोडर्मोडील' हे रसायन कर्करोगाची वाढ रोखते असे आढळले. केमोथेरपीसाठी त्याचा वापर करता येईल अशी शक्यता दिसू लागली. सध्या टॅक्सॉल हे कॅन्सरवर जगभर



वापरले जाणारे रसायन आहे. 'डिस्कोडर्मोडील' त्याची जागा घेऊ शकेल. निसर्गाने एक नवे दालन उघडून दिले असले तरी या रसायनाचा वापर करणे कठीण होते. कारण हे जीव फार कमी प्रमाणात उपलब्ध होते, खोल समुद्रात होते. त्यांच्यापासून औषधे बनविणे कष्टाचे होते. आज नोबेल मिळविणारे रिचर्ड हॅक, नेगीशी व सुझुकी यांनी तयार केलेल्या अभिनव तंत्रानुसार आता 'डिस्कोडर्मोडील' प्रयोगशाळेत निर्माण करणे शक्य झाले आहे. यासाठी त्यांनी पालेडियम या मूलद्रव्याचा उपयोग करून घेतला. 'पालेडियम-क्रिस्टिलाईझ क्रॉस कपलींग रिॲक्शन' हे त्यांनी विकसित केलेले तंत्र. यातून आता पुरेशा प्रमाणात 'डिस्कोडर्मोडील' तयार करून कर्करोगग्रस्तांवर काही प्रयोग करून पाहता येतील.

'पालेडियम-क्रिस्टिलाईझ क्रॉस कपलींग रिॲक्शन' ही बरीचशी सुलभ मात्र खूपच अचूक अशी रासायनिक प्रक्रिया आहे. कार्बन हा जीवसृष्टीचा मुख्य घटक, कार्बनमधील परस्परबंध हे रसायनशास्त्रज्ञांना कायम खुणावतात. दोन कार्बन अणूंना एकत्र आणण्यासाठी रिॲक्टीव्ह पदार्थ वापला जातो. पण यातील गडबड म्हणजे कार्बन स्वत: अन्य काही प्रकिया करतो व अनेक नको असलेले पदार्थ तयार होतात. डिस्कोडर्मोडील सारखी संयुक्त रसायने करणे हे फार किचकटीचे काम असते. त्याच्या अनेक पाय-या असतात. या प्रत्येक पायरीवर नको असलेली जादा रसायने निर्माण झाली की ती दूर करण्याचा व्याप वाढतो. पालेडियम हे मात्र वेगळ्या त-हेने काम करते. पालेडियम जवळ कार्बन येतात. कार्बनचे दोन अणू जवळ आले की परस्परांत बंध निर्माण करतात. पण पालेडियमवर प्रक्रिया करीत नाहीत. यामुळे नको असलेली रसायने तयार होत नाहीत. थोडक्यात पालेडियम दोन कार्बनचे जुळवून देतो, पण त्यांच्या संसारात अडकत नाही.

इथिलीनचे असिटाल्डीहाईडमध्ये रूपांतर करण्यासाठी सर्वप्रथम पालेडियमचा उपयोग जर्मनीतील वॅकर या कंपनीने केला. रिचर्ड हॅक तेव्हा अमेरिकेत तरूण संशोधक होते. त्यांनी या रासायनिक क्रियेचा अधिक अभ्यास केला व पालेडियमचा वापर कॅटलिस्ट म्हणून करण्यास सुरूवात केली. कार्बनची षटकोनी रिंग व कार्बनचे अन्य अणू यांच्यात मजबूत बंध निर्माण करण्यात हॅक यशस्वी झाले. ही फार महत्वाची पायरी होती. हॅकने विकसीत केलेल्या या तंत्रामुळे नॅप्रोझेन हे प्रचंड प्रमाणात वापरले जाणारे वेदनाशामक तसेच अस्थम्यावरील परिणामकारक औषधे तयार करणे शक्य झाले. इलेक्ट्रॉनिक्समध्येही या तंत्राचा भरपूर उपयोग केला गेला.

कार्बनचा अणू खूप गमतीशीर वागतो. त्याला जागृत करून अन्य अणूशी संपर्क करायला लावण्यासाठी शास्त्रज्ञाना ब-याच युक्त्या कराव्या लागतात. व्हिक्टर ग्रीगनार्ड याने १९१२ मध्ये रासायनिक प्रक्रिया केली होती. नेगीशी यांनी १९७७ मध्ये त्यात थोडा बदल केला. त्यांनी झिंक व पालेडियम या दोन्हीचा वापर करून कार्बनचे संयुग तयार केले. यामध्ये बोरान वापरले तर रासायनिक प्रक्रिया अधिक उत्तम होते असे पुढे सुझुकी यांनी दाखवून दिले. सुझुकींनी सुचविलेल्या क्रियेमुळे फार मोठ्या प्रमाणावर रसायनांचे उत्पादन करणे शक्य झाले. कृषी क्षेत्राला याचा बराच फायदा झाला.

अशा रीतीने या तिघांनी थोडी थोडी पण मूल्यवान भर घालीत रासायनिक प्रक्रिया पूर्ण केली. पालेडियम क्रिस्टलाईझ क्रॉस कपलींग रिॲक्शन याचे लक्षवेधी उदाहरण म्हणजे पॉलीटॉक्झीन, कार्बनचे १२९ अणू, हायड्रोजने २२३ अणू नायट्रोजनचे तीन अणू व ऑक्सीजनचे ५४ अणू यामध्ये असतात. निसर्गात हे विषरूपाने असते. याची रचना अतिशय गुंतागुंतीची आहे. ती पालेडियम-क्रिस्टलाईझ क्रॉस कपलींग रिॲक्शनमुळे शक्य झाली.

समुद्र ही फार मोठी फार्मसी आहे असे शास्त्रज्ञ मानतात. सर्व औषधांची खाण तेथे निसर्गाने ठेवली आहे. त्यांचे नमुने तेथे असले तरी ती रसायने कृत्रिम रितीने तयार करण्याचे आव्हान शास्त्रज्ञांसमोर आहे. डायझानोमाईड-ए हे असेच एक रसायन. यामुळे कर्करोगाला आळा बसू शकतो. ड्रॅगमासिडाईन-एफ हे नागिण व एचआयव्हीवर उपकारी आहे. कृत्रिम रितीने ही रसायने बनविण्याची किल्ली हॅक, नेगीशी व सुझुकी यांच्यामुळे हाती आली. रासायनिक प्रकाशासाठीही हे संशोधन उपयुक्त आहे. याचा वापर करून अत्यंत पातळ कंप्युटर मॉनिटर तयार करता येतील. याच वर्षी ही रिॲक्शन ग्राफेनसाठी वापरण्यात आली व ती अत्यंत उपयुक्त ठरली.

निसर्गातील रासायनिक प्रक्रिया शोधून त्यानुसार त्या प्रयोगशाळेत करण्याचे हे उद्योग निरंतर सुरू राहणार आहे. या प्रयोगातूनच मानवी जीवन अधिक सुखकर होईल.

■■■■■

# गीता रहस्य



**श्री अभय अभ्यंकर**

## प्रस्तावना

**गी**ता रहस्य हा ग्रंथ लोकमान्य टिळकांनी मंडाले मुक्कामी कारागृहवासात लिहीला ही गोष्ट सर्व जाणतात. मूळ गीता निवृत्तीपर नसून कर्मयोगपर आहे, किंबहुना गीतेत 'योग' हा एकेरी शब्दच 'कर्मयोग' या अर्थी योजिलेला आहे, हे आग्रहपूर्वक गीता रहस्य ग्रंथात विविध उदाहरणे, संदर्भ देऊन त्यांनी स्पष्ट केले आहे. प्रस्तावनेत त्यांनी "निव्वळ स्वार्थपरायण बुद्धीने संसार करून थकल्या भागल्या लोकांच्या कालक्रमणार्थ, किंवा संसार सोडून देण्याची तयारी म्हणूनही गीता सांगितलेली नाही. म्हणून पूर्ववयातच गृहस्थाश्रमाचे किंवा संसाराचे हे प्राचीन शास्त्र जितक्या लवकर समजून घेणे शक्य असेल तितक्या लवकर प्रत्येकाने समजून घेतल्याखेरीज राहू नये," अशी विनंतीही केली आहे.



ग्रंथ गांभिर्याने समजून घेऊन वाचणे गरजेचे असले तरी तुम्हा आम्हांस ज्या गोष्टींची जिज्ञासा असते, अशांचा उहापोह देखिल सदर ग्रंथात विषयाच्या अनुषंगाने करण्यात आला आहे. अशा बाबी वाचकास ज्ञात व्हाव्यात या उद्देशाने प्रत्येक महिन्याच्या अंकात लेखमालेच्या रूपाने देण्याचा मानस आहे. आजच्या पहिल्या लेखात 'पंचमहाभूतांचा उत्पत्ती क्रम' हा विषय घेतला आहे. या योगे गीतारहस्य हा ग्रंथ मुदलातूनच वाचावा अशी जिज्ञासा निर्माण झाल्यास लेखमालेस यश मिळाल्यासारखे होइल.

## लेखांक पहिला

### गीतारहस्य : पंचमहाभूतांचा उत्पत्ती क्रम

स्थूल पृथ्वी, पाणी, तेज, वायू व आकाश यांस पंचमहाभूते किंवा विशेष असे म्हणतात. यांच्या उत्पत्तीचा क्रम तैत्तिरीयोपनिषदांत असा दिला आहे की, 'आत्मनः आकाशः संभूतः । आकाशद्वायुः । वायोरग्निः । अद्भयः पृथिविः । पृथिव्या ओषधयाः । इ.' (तै.उ.२.१) परमात्म्यापासून (सांख्य म्हणतात त्याप्रमाणे मूळ जड प्रकृतीपासून नव्हे) प्रथम आकाश, आकाशापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्निपासून पाणी व पाण्यापासून पुढे पृथिवी उत्पन्न झाली आहे. तैत्तिरीयोपनिषदांत या क्रमाचे कारण काय ते सांगितलेले नाही. पण उत्तरवेदांत ग्रंथातून पंचमहाभूते निर्माण होण्याच्या या क्रमाची उपपत्ति सांख्य शास्त्रोक्त गुणपरिणामाच्या तत्वावरच लाविलेली दिसत्ये. या उत्तरवेदान्त्यांचे असे म्हणणे आहे की, 'गुणा गुणेषु वर्तन्ते' या न्यायाने प्रथम एकच गुणाचा पदार्थ उत्पन्न होऊन त्यापासून दोन गुणांचे, तीन गुणांचे, अशी वाढ होत गेली आहे. पंचमहाभूतांपैकी आकाशास मुख्यत: शब्द एवढा एक गुण असल्यामुळे आकाश प्रथम उत्पन्न झाले. त्यानंतर वायु. कारण, वायूत शब्द व स्पर्श हे दोन गुण आहेत. वारा वाजतो म्हणजे ऐकू येतो इतकेच नव्हे, तर तो आपल्या स्पर्शेंद्रियासही समजतो. वायूनंतर अग्नि. कारण, शब्द व स्पर्श या दोहोखेरीज अग्नीत रूप हा तिसरा गुण आहे. या तीन गुणांखेरीज रूचि किंवा रस हा पाण्यात चवथा गुण असल्यामुळे अग्नि मागून पाणी झाले असले पाहिजे; आणि शेवटी पृथ्वीत या चारी गुणांपेक्षा गंध हा गुण विशेष असल्यामुळे पाण्यापासून पुढे पृथ्वी उत्पन्न झाली असा सिद्धांत होतो.

(संदर्भ: गीतारहस्य - चतुर्थमुद्रण - १९२३ - विश्वाची उभारणी व संहारणी - पृष्ठ १८० / १८१)

■■■■■

# आदी कैलास दर्शन-एक रोमांचकारी प्रवास



**श्री विजय भास्कर अभ्यंकर**

**गे**ले चार महिने ज्याची आम्ही मोठ्या आतुरतेने वाट पहात होतो तो दिवस म्हणजे १४ ऑगस्ट २०१०. आदी कैलास दर्शन यात्रे करिता मी व माझे २२ मित्र विविध ठिकाणाहून येणार होतो. त्यासाठी आम्ही सम्पूर्ण बन्दोबस्तासहित काठगोदामला जाण्यासाठी मुंबईहून गरीबरथ एक्सप्रेसने प्रयाण केले व दिनांक १५ ऑगस्ट रोजी नैनीताल येथे दिल्ली मार्गे पोहोचलो. १९ ऑगस्टला आम्ही भोवाली येथे कुमाऊ मंडळ विकास निगमला रिपोर्ट केला. भोवाली ते जागेश्वर असा प्रवास करताना आम्ही वाटेत पाताळ भुवनेश्वराचे दर्शन घेतले. तेथे खोल गुहेत उतल्यावर आत मोठी प्रशस्त गुहा आहे व शिवलिंग आहे. सायंकाळी जागेश्वर येथे पोहोचलो. जागेश्वर हे शंकराचे स्थान आहे. येथे १२५ मंदिरांचा समुह आहे. १८ ऑगस्ट रोजी दरडी कोसळल्यामुळे आम्हाला चोकोडी येथे मुक्काम करावा लागला. गेल्या दोन दिवसांचा प्रवास चिडच्या सुंदर जंगलातून झाला. १९ ऑगस्टला आम्ही धारचूला मार्गे पांगला येथे पोहोचलो. पांगला येथून आमचा ट्रेक सुरु झाला. परन्तु पांगला येथे परत दरडी कोसळल्यामुळे आम्हाला एक मोठा डोंगर पार करावा लागला. त्यामुळे आम्हाला पुन्हा एकदा रात्रीचा मुक्काम गाला एवजी बिंदाकुट्टी येथे करावा लागला. त्यासाठी परत एकदा मोठा डोंगर सर करावा लागला. प्रत्येक वेळी संकटांवर मात करीत आम्ही पुढे-पुढे सरकत होतो व या प्रमाणे आम्ही सर्वांनी एकंदर २२ किलोमीटरचे अंतर या दोन दिवसात पार केले. २० तारखेला आम्ही बिंदाकुट्टी ते बुधी हा अतिशय कठीण असा चिंचोळी रस्ता व शेजारी घोंधावत वाहणारी काली नदी पार केली (काली नदी भारत नेपाळ मधील हद्द आहे.) परन्तु एवढे सर्व अडथळे येऊनही आमचे सहकारी अगदी उत्साही वाटत होते.

वरिल प्रवासात आम्हाला मालपा नावाचे गांव लागले. येथे काही वर्षांपूर्वी भारताची प्रसिद्ध नृत्यांगना प्रोतीमा बेदी यांच्या सह सुमारे ४५० जण प्रचंड दरड कोसळल्याने मृत्युमुखी पडले होते. आमचा हा प्रवास अत्यंत धडकी भरविणारा असा होता. येथील एक मोठा नाला व land slide च्या ढिगाऱ्यावरुन आम्ही पलीकडे गेलो. २१ ऑगस्टला आम्ही बुधी तेगाला असा प्रवास केला. पहिल्या दिवसासारखी ३ कि.मी. उभी चढाई होती. आत्तापर्यंत आम्ही दोन डोंगराच्या लहानशा पट्टीत होतो. छिपालेखची चढाई चढल्यावर पुढे पठार लागले, थोडा मोकळेपणा आला. आज पण २० कि.मी. ची चाल होती. दररोजच्या ह्या जीवघेण्या प्रवासाने पाय अक्षरशः आंबले होते, परन्तु आमच्या ट्रेकचा उत्साह कायम होता.

दिनांक २२ ऑगस्टला आमचे सामान घोड्यावरुन न आल्याने आमच्या ट्रेकला गुंजी येथेच मुक्काम करावा लागला. (गुंजी येथे विमानातून ट्रक्स व जेसीबी मशीन्स् आणून रस्ता बनविण्याचे काम प्रगतीपथावर आहे.) आमचे सामान आल्यावर आम्ही एकाच दिवशी काला पानी हे ठिकाण पार करुन नावी डांग येथे पोहोचलो. येथे पोहचल्यावर एका पर्वतावर वरच्या भागात असलेल्या खाचेत बर्फ साचल्यावर **'ॐ आकार'** दिसतो आणि हाच तो **'ॐ आकार'**. परन्तु येथे पावसाळी वातावरणामुळे आम्हाला ॐ पर्वताचे दर्शन पूर्ण असे झाले नाही.

दिनांक २५ रोजी आम्ही काला पानी मार्गे पुन्हा गुंफा येथे आलो व २६ रोजी आदी कैलास येथे पोहोचलो. आदी कैलास हा चिन मधील कैलास पर्वताची थेट प्रतीकृती आहे. श्री शंकराचे मूळ स्थान म्हणजे आदी कैलाश अशी मान्यता आहे. संध्याकाळी आम्हाला आदी कैलाशचे दर्शन झाले. आम्ही सर्व सहकारी हे विलोभनीय दृश्य बघुन धन्य झालो. आमचा प्रवास सार्थकी लागल्यासारखे जणू आम्हा सर्वांना वाटायला लागले.

दिनांक २७ ऑगस्टला पार्वती सरोवराचे दर्शन घेऊन परतीच्या प्रवास शुरु केला. परतीच्या प्रवासात दिनांक ३० ऑगस्टला पुन्हा एकदा आम्हाला निर्सगाशी सामना करावा लागला. अत्यंत कठीण व धोकादायक बुधी ते गाला असा प्रवास केला. या प्रवासा दरम्यान आमचा ट्रेक जातांना व येतांना एकही फोटो काढू शकलो नाही याचे वाईट वाटते. नंतर गाला ते धारचूसा मार्गे दिहीहार हा प्रवास आम्हाला प्रचंड धो-धो अशा कोसळणाऱ्या पावसात करावा लागला.

अशा प्रकारे आमची आदी कैलाशची रोमांचकारी व अविस्मरणीय यात्रा पार पडली. आमच्या ट्रेकने १४ दिवसांच्या कालावधीत एकंदर २१४ कि.मी. अंतर पायीचालून पहाडी प्रवास यशस्वीपणे पार केला. या वेळी भरपूर थंडीशी सामना करावा लागला. परन्तु येथील निसर्ग सौदर्य बधून डोळ्याचे पारणे फिटले. संपूर्ण प्रवासात आपल्या भारतीय सैन्याचे अस्तित्व जाणवत होते. आपले भारतीय सैन्य किती विपरित परिस्थीती मध्ये देशाच्या सीमांचे रक्षण करतात याचा प्रत्यक्ष अनुभव आला हे बधून तर आम्ही थक्क झालो. तसेच कुमाऊ निगमचे व्यवस्थापन खूपच उत्तम होते.येवढ्या दूर व ऊंच ठिकाणी त्यांची व्यवस्था सुनियोजित व उत्तम होती.

शेवटी असे वाटते की प्रत्येक भारतीयाने दूरवरच्या भागात प्रवास करायला हवा. त्यामुळे तेथील लोकसंस्कृती व कला याची माहिति मिळते व तथील लोकांशी जनसंपर्क वाढतो.

■■■■■

# कुंडलीच्या माध्यमातून विवाह आणि वैवाहिक जीवन

सौ. स्नेहल निशिकांत अभ्यंकर



**वि**वाह हा आयुष्यातील एक महत्वाचा टप्पा आहे. विवाहबंधनामुळे दोन जीव एकत्र येतात. यामध्ये केवळ स्त्री-पुरूषांचे मीलन हा एकच दृष्टीकोन नसून दोन परिवारांचे एकत्रीकरण सुरक्षित वैवाहित सुख, नातेसंबंध, वंशवृद्धी असे अनेक पैलू अंतर्भूत आहेत.

विवाह जमणे आणि विवाह टिकून राहणे या दोन गोष्टी भिन्न आहेत. विवाह होणे हे कदाचित् सोपे आहे पण तो चांगल्या प्रकारे टिकून राहणे हे तितकेच किंबहुना जास्त महत्त्वाचे आहे. विवाहसंस्था ही आपल्या समाजाला,कुटुंबव्यवस्थेला व निसर्गचक्राला पुढे-पुढे नेणारी संस्था आहे. परंतु सध्या समाजातील कौटुंबिक स्थिती पाहता. स्वत:ची नोकरी स्वत:चे करीअर 'मी व माझे' अशा स्वार्थी गणितांचे प्रमाण वाढत आहे. वैवाहिक जीवनातील तडजोडीच्या संकल्पना बदलत चालल्या आहेत. याचा परिणाम म्हणून विवाहानंतर दोघांनी एकमेकांना जाणून घेण्याच्या, समजून घेण्याच्या आधीच घटस्फोटाच्या समस्येला सामोरे जावे लागून ते विभक्त झालेले दिसतात. या घटनेमुळे त्या दोघांवरच नाही तर दोन्ही कुटुंबावर त्याचे वाईट पडसाद उमटलेले दिसतात. या घटस्फोटाच्या समस्येचे निराकरण करून सुखी व दीर्घायु वैवाहिक जीवनाचा अनुभव देण्यासाठी मदत करते ते 'ज्योतिषशास्त्र' कारण 'ज्योतिष' म्हणजेच 'ईश्वरीय ज्योति' - जी अंधारातून प्रकाशाकडे जाण्यासाठी मार्ग दाखवते. त्यामुळेच आपल्या जन्मकुंडलीच्या माध्यमातून आपण जीवनात येणा-या समस्यांवर मार्गदर्शन मिळवू शकतो.




विवाह ठरवताना विवाहेच्छूक मुलामुलींच्या कुंडल्यांचे पारंपरिक पद्धतीने पंचागावरून गुणमेलन केले जाते. त्यात एकूण ३६ गुणांपैकी कमीतकमी १८ गुण जमावेत असा दंडक असतो. हे गुणमेलन आवश्यक आहेच परंतु गुण जुळून सुद्धा कधी कधी संसार विस्कटलेले दिसतात. त्यामुळेच या पारंपारिक पद्धतीबरोबरच दोघांच्याही कुडल्यांचा वैयक्तिकरीत्या तसेच एकत्रितपणे विचार करणे आवश्यक ठरते. कारण वैवाहिक जीवन जास्तीत जास्त यशस्वी होण्यासाठी ३६ गुणांपैकी जितके गुण जमले नाहीत त्या गुणांसाठी दोघांनी तडजोड करणे अत्यावश्यक आहे आणि ही तडजोड त्यांना कशा स्वरूपात करावी लागेल, कोणत्या मुद्यांवर करावी लागेल हे दोघांच्याही कुंडल्यांवरून चांगल्या प्रकारे समजू शकते. वैयक्तिकरीत्या आपल्या ओंजळीत किती सुख पडणार आहे याची पूर्वकल्पना मिळाली तर त्याप्रमाणे परिस्थितीशी तडजोड करण्यास मानसिक तयारी होते. अवास्तव अपेक्षा ठेवल्या जात नाहीत आणि पुढील अप्रिय घटनांमुळे होणारे नुकसान वाचवू शकतो.

वैवाहिक जीवन हे प्रामुख्याने सहा गोष्टींवर अवलंबून असते. १. स्वभाव जुळणे २. लैंगिक सुख/ वैवाहिक सुख ३. संतती ४. ऐहिक गोष्टी व त्यातून मिळणारे सुख तसेच मानसिक समाधान ५. सासू- सासरे (दोघांचेही) आणि ६. करिअर.

कुंडलीवरून स्वभावाचा विचार करता, जन्मलग्नकुंडलीतील लग्नराशि व तिचा स्वामी ग्रह, चंद्रराशि व तिचा स्वामी ग्रह, चंद्रनक्षत्र व रवीची स्थिती यांचा विचार महत्त्वाचा ठरतो.

लग्न व लग्नस्वामी हे स्वत: त्या व्यक्तीचे निदर्शक आहेत त्यावरून त्या व्यक्तींचा जीवनाकडे बघण्याचा दृष्टीकोन समजू शकतो. त्यामुळे लग्न ही माणसाची प्रवृत्ती आहे. तर चंद्र हा मनोवृत्ती दाखवतो कारण चंद्र हा मनाचा कारक आहे. पारंपारिक गुणमेलन हे तर चंद्रनक्षत्रावरच आधारलेले असल्याने त्याचाही विचार महत्त्वाचा आहे. रवी हा स्वत्त्व जपणारा आहे. तो अस्तित्वाचा कर्तुत्वाचा, अधिकाराचा कारक आहे. त्यामुळे या सर्व ग्रहांवरून व्यक्तीच्या स्वभावाची कल्पना येते. त्यामुळे दोघांच्या कुंडलीचे लग्नस्वामी, चंद्रस्वामी, रवीराशिस्वामी एकमेकांचे मित्रग्रह असतील, ते एकमेकांशी शुभयोगात, सुस्थितीत असतील तर दोघांचे स्वभाव जुळून एकमेकांशी

चांगले पटते.

'संतती' हा वैवाहिक सुखाचा अविभाज्य घटक आहे किंबहुना वैवाहिक जीवनाची फलश्रुती आहे. कुंडलीवरून संततीचा विचार करताना प्रामुख्याने पंचमस्थान (संततीस्थान) व द्वितीय हे कुंटुंबवृद्धीचे स्थान म्हणून विचारात घ्यावे लागतात.

ऐहिक सुख, गृहसौख्य तसेच मानसिक सौख्य याचा विचार करताना चतुर्थ स्थान व चतुर्थेश यांची स्थिती महत्त्वाची ठरते.

वैवाहिक सुखाच्या विचारात सप्तम-लाभ-तृतीया हा कामत्रिकोण अतिशय महत्त्वाचा आहे. या स्थानातील शुभग्रह किंवा त्यांची या स्थानांवर असलेली शुभ दृष्टी वैवाहिक सुखाची वृद्धी करतात तर पापग्रह वैवाहिक सुखात अडथळे आणतात.

या कामत्रिकोणाच्या जोडीला अष्टम व व्यय ही स्थाने पण महत्त्वाची आहेत. कामजीवन हा प्रत्येकाच्या आयुष्याचा अविभाज्य घटक आहे आणि बरेचदा वैवाहिक जीवनातील अनेक विसंवादांचे मूळ, हे लैंगिक संबंधातील विसंवादात आहे असे आढळते. त्यामुळेच या गोष्टी जुळल्या तरच वैवाहिक जीवन टिकून राहते नाहीतर दुरावा निर्माण होण्यास वेळ लागत नाही. मनाने एकत्र येण्यास हे संबंध महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळेच ही दोन स्थाने या दृष्टीने महत्त्वाची ठरतात.

वरील सर्व स्थाने व त्यांचे भावेश ग्रह जसे महत्त्वाचे आहेत त्यांच्या बरोबरीनेच शुक्र या ग्रहाचा सर्वांगीण अभ्यास महत्त्वाचा आहे. शुक्र हा पत्नीचा, स्त्रीचा कारक ग्रह असून प्रेम, प्रणय, व्यक्तीचे कामसुख त्याचे भिन्नलिंगी व्यक्तीबद्दलचे आर्कषण या गोष्टी शुक्रावरून बघतात.

स्त्रियांच्या कुंडलीत रवी हा पतीकारक म्हणून महत्त्वाचा आहे. तसेच तिच्या कुंडलीतील मंगळावरून पतीचा पुरूषार्थ याचा बोध होतो. पुरूष कुंडलीत चंद्र हा पत्नीचा कारक म्हणून विचारात घेतात. तर शुक्रावरून जोडीदाराचे प्रेम, स्त्रीसुख व कामसुख विचारात घेतात.

सौभाग्याचा कारक, परंपरा टिकवून ठेवणारा असा शुभ ग्रह गुरू शिवाय विवाहचा विचार पूर्ण होऊच शकत नाही. विवाहचा कालनिर्णय करताना गुरूचे गोचर भ्रमण महत्त्वाचे असते. तसेच तो टिकवून ठेवण्याच्या बाबतीत दोघांच्याही कुंडलीतील गुरू हा महत्त्वाची भूमिका बजावतो. आज २१व्या शतकात पुरूषांच्या बरोबरीने स्त्रियांच्या करिअरचा विचार करणे अपरिहार्य आहे. यासाठी स्त्रीच्या कुंडलीतील लग्न-लग्नेश, चंद्र, रवि, मंगळ, यांच्या राशीतत्वांचा विचार करून ती स्त्री करिअरला जास्त महत्व देणारी आहे, की घराला महत्व देणारी आहे. याचा अंदाज घेऊन त्याची विवाहपूर्व कल्पना देता येते.

आजच्या काळात एक किंवा दोनच मुले असल्याने दोघांच्याही कुंडल्यात सासू- सास-यांचा विचार आवश्यक ठरतो. कारण मुलाप्रमाणेच मुलीचे आईवडील देखील मुलीच्या काळजीपोटी व प्रेमापोटी मुलीच्या संसारात अतिरिक्त लक्ष घालतात. त्याचा परिणाम मुलीच्या वैवाहिक जीवनावर होऊन कधी-कधी टोकाचे परिणाम दिसून येतात. त्यामुळे यासाठी विवाहेच्छुक मुलामुलींना व त्यांच्या पालकांना देखील कुंडलीच्या माध्यमातून चांगल्या प्रकारे समुपदेशन करता येते.

अशा प्रकारे, कुंडल्यांच्या माध्यमातून त्यातील गुणदोषांची, उणीवांची विवाहपूर्व कल्पना विवाहेच्छुक मुलामुलींना व त्यांच्या पालकांना दिली गेली तर पुढील होणारे नुकसान टळून त्यांचे वैवाहिक जीवन नक्कीच 'सुखी व दीर्घायु' होईल यात शंका नाही ! ''शुभम् भवतु''

■■■■■

## आवाहन

*ई-अभ्यंगच्या दिवाळी पाडवा विशेषांका बद्दल आपली प्रतिक्रिया आम्हाला खालील पत्यावर किंवा ई-मेल द्वारे अवश्य कळवा. तसेच पुढील ई-अभ्यंग विशेषांकासाठी आपले लेख/कथा/कविता, हास्य विनोद, तसेच चारोळ्या इत्यादि साहित्य आम्हाला अवश्य पाठवा. कृपया लिखाणासोबत पासपोर्ट आकाराचा फोटो ई-मेल किंवा टपालाद्वारे संपूर्ण नाव, पत्ता, दूरध्वनी/भ्रमणध्वनी ई-मेल आयडी सह अवश्य पाठवावा.*

*डॉ. सौ. संपदा लिलाधर अभ्यंकर,*
*६९-बी-३, वृंदावन सोसायटी,*
*ठाणे(प)-४००६०१*
abhyankarsampada@yahoo.com
भ्रमणध्वनी: ९३२३८७३०७५
abhyvivek.६२@gmail.com
भ्रमणध्वनी: ९०९६०८१६९३

अभ्यंकर परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा लिलाधर अभ्यंकर यांच्या हस्ते अभ्यंग या पहिल्या गुढीपाडवा ई-विशेषांकाचे उद्‌घाटन दिनांक १६ मार्च २०१० रोजी ठाणे येथे अभ्यंकर परिवाराच्या वेबसाईट वर करण्यात आले. त्या प्रसंगी टिपलेले छायाचित्र





अभ्यंकर परिवाराच्या अध्यक्षा डॉ. सौ. संपदा लिलाधर अभ्यंकर यांच्या हस्ते अभ्यंग या पहिल्या गुढीपाडवा ई-विशेषांकाचे उद्‌घाटन दिनांक १६ मार्च २०१० रोजी ठाणे येथे अभ्यंकर परिवाराच्या वेबसाईट वर करण्यात आले. त्या प्रसंगी टिपलेले छायाचित्र





दिनांक २८ फेब्रुवारी २०१० रोजी श्रीमती जानकीबाई परशुराम अभ्यंकर यांनी वयाचे १०० वर्ष पूर्ण करून १०१ व्या वर्षात पदार्पण केले. त्या प्रसंगी त्यांचे कौतुक करतांना अभ्यंकर कुटुंबिय





दिनांक २८ फेब्रुवारी २०१० रोजी श्रीमती जानकीबाई परशुराम अभ्यंकर यांनी वयाचे १०० वर्ष पूर्ण करून १०१ व्या वर्षात पदार्पण केले. त्या प्रसंगी त्यांचा सत्कार करतांना अभ्यंकर परिवाराचे पदाधिकारी





दिनांक २८ फेब्रुवारी २०१० रोजी श्रीमती जानकीबाई परशुराम अभ्यंकर यांनी वयाचे १०० वर्ष पूर्ण करून १०१ व्या वर्षात पदार्पण केले. त्या प्रसंगी त्यांचा सत्कार करतांना अभ्यंकर परिवाराचे पदाधिकारी





श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार व त्यांच्या ट्रेकने दिनांक १४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०१० या कालावधीत आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी विविध ठिकाणाहून श्री विजय अभ्यंकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपलेले विविध मनोहरी छायाचित्र






श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार व त्यांच्या ट्रेकने दिनांक १४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०१० या कालावधीत आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी विविध ठिकाणाहून श्री विजय अभ्यंकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपलेले विविध मनोहरी छायाचित्र






श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार व त्यांच्या ट्रेकने दिनांक १४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०१० या कालावधीत आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी विविध ठिकाणाहून श्री विजय अभ्यंकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपलेले विविध मनोहरी छायाचित्र






श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार व त्यांच्या ट्रेकने दिनांक १४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०१० या कालावधीत आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी विविध ठिकाणाहून श्री विजय अभ्यंकर यांनी आपल्या कॅमेऱ्यात टिपलेले विविध मनोहरी छायाचित्र





श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार व त्यांच्या ट्रेकने दिनांक १४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०१० या कालावधीत आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी ॐ पर्वताची विविध रुपे दर्शविणारे मनोहरी छायाचित्र





श्री विजय भास्कर अभ्यंकर, विरार व त्यांच्या ट्रेकने दिनांक १४ ऑगस्ट ते ३० ऑगस्ट २०१० या कालावधीत आदि कैलाश मानसरोवर यात्रा पूर्ण केली त्या प्रसंगी ॐ पर्वताची विविध रुपे दर्शविणारे मनोहरी छायाचित्र



